# त्या दिवशी कलवरीवर

धन्यवाद, भाऊ नेविल. [भाऊ नेविल म्हणतात, "बंधु, परमेश्वर तुम्हास आशीर्वाद देवो!"—सम्पा.] बंधू नेव्हिल, देव तुला आशीर्वाद देवो. खूप खूप, धन्यवाद.

2 सुप्रभात, मित्रांनो. आज सकाळी, येथे आराधनालयात परत असणे हे भाग्य आहे, प्रभूची सेवा करण्यासाठी, वचन प्रचार करण्याद्वारे आणि आजारी लोकांसाठी प्रार्थना करण्याद्वारे. आणि या दिवसाबद्दल मी मनापासून कृतज्ञ आहे.

3 आणि जसा मी आत आलो, मी चकित झालो. एक भाऊ वर गेला आणि म्हणाला, "मी त्या बरे झालेल्या अपात्र कुष्ठरोग्यासारखा होऊ इच्छित नाही." तो बंधू राईट आहे. मी त्याच्यासाठी प्रार्थना केली, आणि प्रभुने त्याला पूर्णतः बरे केले. आणि मला हस्तांदोलन करण्यासाठी, तो रडत, आला, आणि म्हणाला की—की त्याला बरे केल्याबद्दल—बद्दल प्रभूचे आभार मानू इच्छितो. त्याला परत येऊन प्रभूचे आभार मानायचे होते. ते पूर्णतः निघून गेले आहे. तो—तो आता पूर्णतः बरा झाला आहे. त्या साक्षीसाठी आम्ही कृतज्ञ आहोत.

4 आणि चार्ली, आपण आणि बंधू जेफ्रीस, आपण इच्छित असाल, तर येथे वर या आणि येथे वर बसा. आणि आपले मन;पूर्वक स्वागत आहे, म्हणून आपल्याला उभे रहावे लागणार नाही. तेथे दुसरे भाऊ, आणि भाऊ वुड, नुकतेच येथे आले आहेत. आपण... येथे थोडीशी, येथे बाकांवर काही जागा आहेत, जेणेकरून आपल्याला उभे रहाण्याची गरज नाही. माझा विश्वास आहे, की येथे काही जागा आहेत, आणि होय, या ठिकाणी येण्यास आणि ह्या जागा घेण्यास आपले फार–फार स्वागत आहे.

5 आपल्याला आनंद झाला आहे...माझा विश्वास आहे की असे एकदा सांगितले गेले होते, "जेव्हा त्यांनी मला सांगितले तेव्हा मला आनंद झाला..." बंधु, देव तुम्हाला आशीर्वाद देवो. [एक भाऊ म्हणतो, "सदैव प्रचारकाच्या जवळ राहणे आवडते."—सम्पा.] धन्यवाद. धन्यवाद, धन्यवाद. "मला आनंद झाला जेव्हा ते मला म्हणाले, आपण प्रभूच्या घरात जाऊ या." प्रभूच्या घरात जाणे, हे ख्रिस्ती लोकांचे भाग्य व आनंद आहे.

6 आज सकाळी, माझ्या बऱ्याच मित्रांना सभोवती पाहून, मी अतिशय आनंदित आहे. ओहीयोहून, येथे भाऊ आणि बहिण डॉचला पाहून मी आनंदित झालो आहे. मी मागे तेथे भाऊ आणि बहीण आर्मस्ट्रॉंग पाहत आहे, जे थेट ओहीयोहून आले आहेत. देव तुम्हा सर्वांनाही आशीर्वाद देवो. आणि, अरे, आजूबाजूला पहात असताना, आपण बऱ्याच जणांना पाहता, त्या सर्वांची नावे घेणे ही एक प्रकारे कठीण गोष्ट आहे. आज सकाळी, केंटकीमधून, बहिण हूवर, तुम्हाला पाहून आम्ही आनंदित आहोत. आणि चार्ली आणि नेल्ली, भाऊ जेफ्रीज आणि त्याचे कुटुंब, आणि शहराबाहेरून बरेच लोक आले आहेत.

7 म्हणून आज सकाळी, आम्ही प्रभूमध्ये एक महान समय मिळण्याची अपेक्षा करीत आहोत, अपेक्षा करीत आहोत की देव अशा प्रकारे आपली भेट घेईल की आपल्या आत्म्यास आशीर्वाद मिळेल आणि आपल्याला ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या मिळतील.

8 आणि मी या ठिकाणाला सर्व बाजूनी पहात होतो, जर मी येथे सर्व माझ्या मित्रांना बोलवण्यास गेलो तर, तर मी ह्या सकाळचा सर्वाधिक वेळ घेईन, सगळ्यांशी बोलत असता. मला चर्चमध्ये परत येताना, सर्व लोकांना पाहताना, भेटताना बरे वाटत आहे.

9 तर ते कसे असेल जेव्हा आपण स्वर्गात जाऊ, आणि आम्ही तेथे अनंत काळाच्या महान समयासाठी, अनंतकाळच्या सहभागीतेत एकत्र भेटू, देवाच्या राजासनाभोवती, आणि ते सर्व आशीर्वाद जे आपण हृदयात जतन केले आहेत? आपण, तेथे, त्याच्या प्रतिरुपाप्रमाणे, आणि त्याच्या प्रतिमेमध्ये बनविले जाऊ, आणि त्याचा आत्मा आपल्यावर, अनंतकाळपर्यंत त्याची उपासना आणि सेवा करण्यासाठी असेल, कधीही थकणार नाही.

10 जरा विचार करा, असे काहीही नाही जे आपण विचार करू शकता, जे आपण करू इच्छिता, पण कधीतरी ते करताना तुम्ही थकता. चार्ली, मला वाटते तुम्हाला आणि मला असे करण्यास आवडत असलेल्या कोणत्याही गोष्टीपेक्षा खारीची शिकार करण्यास आवडते, तशा प्रकारे, पण, तुम्हाला माहिती आहे, तुम्हाला हे करत असतांना थकवा येतो.

11 आणि मला—मला डोंगर चढणे, डोंगरावर जाणे आणि केवळ दूरवर चालणे—चालणे आवडते. पण कधीतरी, मी थकतो, तुम्हाला काहीतरी करावेसे वाटते.

12 आणि मला गाडी चालविणे आवडते. कधी–कधी मला एक प्रकारचा कंटाळा येतो आणि थकवा येतो, नसा आखडतात. मी फक्त माझ्या कारमध्ये उडी घेतो आणि बाहेर येतो, आणि रस्त्यावरून जाताना स्टीयरिंगवर धरतो, गाणे गात, "मी इतका आनंदी आहे की मी म्हणू शकतो मी त्यांच्यापैकी एक आहे," किंवा काहीतरी असे. फक्त ते चाक पकडुन, आणि गाणे गात, आणि माझ्या पायाने ठेका देत, आणि ओरडत. आणि, बरं, थोड्या वेळाने, मी थकतो, आणि मग मी घरी परत येतो आणि काहीतरी वेगळं सुरू करतो.

13 परंतु जेव्हा आपण त्या नवीन राज्यात देवाची उपासना करू, तेव्हा तेथे कधीही थकण्याचा क्षण येणार नाही, तेथे फक्त—फक्त सदैव आशीर्वाद असेल, अधिक आणि अधिक. परंतु, अर्थातच, त्यानंतर आपण बदलले जाऊ. आपण आता जसे आहोत तसे नसणार. आपण वेगळे असणार, आपण आता आहोत त्यापेक्षा वेगळे प्राणी असणार. म्हणून, आम्ही आनंदी आहोत.

14 मी केवळ विचार करीत होतो. मला ठाऊक नाही की मी हे कधी केले आहे, ह्याचा उल्लेख केला आहे की नाही. भाऊ चार्ली, काही काळापूर्वी, मी त्यांच्याबरोबर केंटकीमध्ये होतो, आणि त्याने म्हटले, "भाऊ ब्रॅन्हम, तुम्हाला असं वाटतं, सहस्त्रावधीच्या काळात, तूम्ही आणि मी खारीची शिकार करणारे असू?"

मी म्हणालो, "चार्ली, मला असं वाटत नाही."

15 ते म्हणाले, "ठीक आहे, आम्हाला ते खूप चांगले वाटले," ते म्हणाले, "तुम्हाला—तुम्हाला वाटते की आपण सहस्त्रवधीच्या काळामध्ये येऊ तेव्हा आपण तसे करू?"

मी म्हणालो, "नाही, सहस्त्रवधीच्या काळामध्ये काहीही मारले जाणार नाही."

आणि तो म्हणाला, "बरं, आम्हाला ते फक्त आवडलं."

16 मी म्हणालो, "चार्ली, जर एकेकाळी तू डुक्कर होतास हे मी तुला पटवू शकलो तर काय होईल, आणि तुला एक उच्च मानव प्राणी, मानव होण्यासाठी उठ विले गेले तर? तुम्ही परत जाऊन, आणि एखाद्या डुक्कराचा आनंद उपभोगायची इच्छा कराल का?"

म्हणाला, "नाही."

17 मी म्हणालो, "पाहा, आपण डुक्करापेक्षा कितीतरी उच्च आहात, आता, आपण मनुष्य आहात, तुम्हाला यापुढे कधीही डुक्कर होण्याची इच्छा होणार नाही." मी म्हणालो, "आता

त्यास दहा हजारांनी गुणाकार करा, आणि तेच तुम्ही असाल जेव्हा तुम्ही येथून बदलले जाल जे तुम्ही व्हाल. मग तुम्हाला कधीच पुन्हा मनुष्य व्हावेसे वाटणार नाही."

18 ते बरोबर आहे. ते काहीतरी वेगळंच असेल. मला केवळ त्या विचारांनी इतका आनंद वाटतो, की एके दिवशी आपण त्या उच्च ठिकाणी चढणार आहोत.

19 बरं, आता, जर प्रभुची इच्छा असेल तर, पुढच्या रविवारी, जे जवळपास...मग मी, माझ्या चांगल्या मित्रासह वायमिंगला; किंवा आयडाहोमध्ये, माझ्या एका चांगल्या मित्रासह, जाण्यासाठी निघणार आहोत, बंधू मायनर आरगनब्राइट, बंधू क्रेट सोनमोर, द ख्रिसशियन बिजनेस मेन.

20 पुढील आठवड्यात, पुढच्या आठवड्यानंतर, आता; 7 आहे, मी व्हॉइस ऑफ हिलिंग कन्व्हेन्शनमध्ये टेक्सासच्या, डॅलस येथे—येथे असणार आहे. आणि मी 7 तारखेला रात्री प्रचार करणार आहे. आणि नंतर मी परतल्यावर, बंधू अर्गनब्राइट आणि ख्रिश्चन बिझनेस मेनसमवेत आयडाहोमध्ये जाणार आहे. आम्ही निघण्यापूर्वी, मिनीपोलिस येथे कदाचित एक रात्र राहू. आणि मग एक ख्रिश्चन बिझनेस मेन ब्रेकफास्ट येथे.

21 प्रभूची इच्छा असल्यास, पुढच्या रविवारी सकाळी मला पुन्हा प्रार्थनागृहात परत यायचे आहे, आणि जर ते परवानगीयोग्य असेल आणि परमेश्वराची इच्छा असेल तर. आणि जर प्रभूची इच्छा असेल, तर मला *व्हर्लविंड इन द विंड,* या विषयावर बोलायचे आहे. संपूर्ण आठवडाभर, ते माझ्या अंत:करणात असल्यासारखे वाटत आहे.

22 आणि दुसऱ्या दिवशी सकाळी, पहाटे, अंदाजे चार वाजता, मी उठलो आणि मला हा विचार आला, "त्या दिवशी कलवरी वर." आणि मला आज सकाळी, त्यावर बोलायचे आहे: *त्या दिवशी कलवरीवर.*

23 आणि आता या वाचनासाठी, आपण आपल्या बायबलमध्ये, पवित्र शास्त्रात, वळूया, संत मत्तयकृत शुभवर्तमानाचा, 27वा अध्याय. आणि आपण 27व्या वचनापासून प्रारंभ करू आणि या पवित्र वचनाचा एक भाग वाचू, आपली पार्श्वभूमी कळण्यासाठी, मग आपण त्वरित प्रारंभ करू. आणि प्रचार सभेनंतर, आपण आजारी लोकांसाठी प्रार्थना करणार आहोत.

24 आणि, अरे, मागील वेळेपासून येथे, परत आणीत आहे, आणि माझ्या नवीन प्रकारच्या सेवकाईची रचना बनवीत आहे. बऱ्याच समयापासून मला मिळालेल्या साक्षीपेक्षा ह्या सभेंतून मला खूप साक्ष मिळाल्या आहेत.

25 याबद्दल असे काहीतरी आहे, की ते कितीही अलौकिक असले तरी याची पर्वा न करता, आपण त्या व्यक्तीशी संपर्क साधला पाहिजे. पण, पहा, आरोग्य हे त्या व्यक्तीच्या विश्वासावर अवलंबून असते. आता, एखाद्याचा विश्वास असल्यास...

26 आणि ते पाहतात, जणू काही, पवित्र आत्मा प्रेक्षकांवर येतो आणि म्हणतो, "*अमुक–अमुक* गोष्टी घडल्या आहेत. आणि, की, तुमचे नाव *अमुक–अमुक* आहे. आणि आपण *अशा* ठिकाणाहून आला आहात. आणि आपण *अशी* गोष्ट केलेली आहे. आणि हे *असेच* होईल." आणि हे सर्व अगदी त्या मार्गाने घडताना पाहिले!

27 तेव्हा, तेथे बसलेल्या, त्या व्यक्तीने, वर पाहिले पाहिजे आणि म्हणावे, "तो देव असला पाहिजे. मी माझे आरोग्य स्वीकारतो."

28 परंतु, त्याऐवजी, तो व्यक्ती म्हणतो, "माझ्यावर हात ठेवा आणि माझ्यासाठी प्रार्थना करा, म्हणजे मी बरा होईन." परंतु येथे अमेरिकेत आपल्याला तसेच शिकविले जाते, आणि, म्हणून, तसा विश्वास ठेवतात. आणि ते नक्कीच वचनाप्रमाणे आहे.

29 परंतु आता आपल्याला, आफ्रिका आणि वेगवेगळ्या ठिकाणी, असे आढळते, असेच काहीतरी होऊ दे, सर्व प्रेक्षक एकाच वेळी पुढे होऊन, त्यांचे आरोग्य स्वीकारतात, कारण त्यांना काहीच शिकविलेले नाही. पहा? त्यांना आरोग्यही शिकवले जात नाही. आणि मग जेव्हा ते हे पाहतात, ते जाणतात की तेथे देव आहे जो जीवंत आहे. "आणि जर तो जीवंत आहे, तो—तो सर्वोच्च आहे, आणि तो—तो आरोग्य देतो." आणि तेच आहे, कारण तो पाया आधीपासूनच घातला गेला आहे, तो पाया हा आहे, की तो आरोग्य देणारा आहे, आणि लोकांना आरोग्य देतो. मग जेव्हा ते त्याची उपस्थिती त्याच्या मंडळी द्वारे कार्य करताना पाहतात, तेव्हा ते म्हणतात, "ते निर्णय घेतात. आम्हाला ह्याचीच गरज आहे."

30 पण आपल्याला, "आजाऱ्यांवर हात ठेवणे," आणि अशा गोष्टी शिकवल्या गेल्या आहेत. हेच कारण आहे की हे अमेरिकेत इतके चांगले कार्य करीत नाही.

31 आता, लक्षात ठेवा, पुढच्या रविवारी सकाळी, प्रभूची इच्छा असेल, तर नक्कीच, भाऊ नेविल याची घोषणा करतील. आणि...द...*वाऱ्यामध्ये एक वावटळ.*

32 आता, मी तुम्हाला आपल्या शास्त्रवचनांकडे, मत्तय 27 कडे जाण्यास थोडा वेळ देत आहे. आपण संत मत्तयकृत शुभवर्तमानाच्या—च्या 27 व्या वचनापासून वाचन सुरू करू या. आता वाचनाकडे बारकाईने लक्ष देऊ या.

> आणि *सुभेदाराच्या शिपायांनी येशूला वाड्यांत नेले आणि सगळी तुकडी त्याच्याविरुद्ध जमविली.*
>
> *आणि त्यांनी त्याची वस्त्रे काढली व त्याला लाल किरमिजी झगा घातला.*
>
> *आणि जेव्हा त्यांनी काटयांचा मुकुट गुंफून, त्याच्या मस्तकावर ठेवला, आणि त्याच्या हातात...एक वेत दिला: आणि त्यांनी त्याच्यापुढे गुडघे टेकले, व त्याची थट्टा केली, ते म्हणाले, हे यहूद्यांच्या राजा, नमस्कार!*
>
> *आणि ते त्याच्यावर थुंकले, आणि तोच वेत घेऊन त्याच्या मस्तकावर मारला.*
>
> *...मग त्यांनी त्याची थट्टा केल्यावर, त्यांनी त्याचा झगा काढून घेतला, आणि त्याची वस्त्रे त्याच्या अंगात घातली, आणि त्याला वधस्तंभावर खिळण्यासाठी घेऊन गेले.*
>
> *आणि जेव्हा ते बाहेर आले असता शिमोन नावाचा कोणीएक: कुरेनेकर मनुष्य त्यांस आढळला, त्याला त्यांनी वधस्तंभ वाहण्याकरिता वेठीस धरले.*
>
> *मग गुलगूथा नावाची जागा, म्हणजे कवटीची जागा येथे येऊन पोचल्यावर,*
>
> *त्यांनी त्याला पित्तमिश्रीत द्राक्षरस प्यावयास दिला:...परंतु तो चाखून पाहिल्यावर तो पिईना.*
>
> *आणि त्यांनी त्याला वधस्तंभावर खिळल्यावर त्यांनी चिठ्या टाकून त्याची वस्त्रे वाटून घेतली. ते यासाठी की संदेष्ट्यांनी जे सांगितले होते ते पूर्ण व्हावे, त्यांनी माझी वस्त्रे आपसात वाटून घेतली, आणि माझ्या वस्त्रावर त्यांनी चिठ्ठ्या टाकल्या.*
>
> *...नंतर तेथे बसून ते त्याच्यावर पहारा करीत राहिले;*
>
> *आणि लावला...त्याच्या डोक्याच्यावर दोषारोपाचा लेख लावला,* ***तो असा हा यहूद्यांचा राजा येशू आहे.***

*त्यावेळी त्याच्याबरोबर दोन लुटारू वधस्तंभावर खिळले होते, एक उजवीकडे आणि दुसरा डावीकडे.*

*आणि ते—ते जवळून जाणारे येणारे डोकी डोलवीत त्याची अशी निंदा करीत होते,*

*आणि म्हणू लागले, मंदिर मोडून तीन दिवसांत* बांधणाऱ्या, *स्वत:चा बचाव कर. जर तू देवाचा पुत्र असल्यास, तर वधस्तंभावरुन खाली उतर.*

*तसेच मुख्य याजकही, शास्त्री आणि वडील, ह्यांच्याबरोबरीने थट्टा करीत, म्हणाले,*

*त्याने दुसऱ्यांना वाचवले;त्याला स्वत:ला वाचविता येत नाही. जर तो इस्राएलाचा राजा आहे; तर त्याने आता वधस्तंभावरुन खाली उतरावे, म्हणजे आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू.*

*तो देवावर विश्वास ठेवितो; तो त्याला हवा असेल तर त्याने त्याला आता सोडवावे:कारण मी देवाचा पुत्र आहे असे तो म्हणत असे.*

*जे लुटारू त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळलेले होते, त्यानीही त्याची निंदा केली.*

*मग दुपारी सहाव्या तासापासून नवव्या तासापर्यंत देशभर अंधार पडला.*

*आणि सुमारे नवव्या तासाला येशू मोठ्याने आरोळी मारून बोलला, एली, एली, लमा सबखथनी? म्हणजे, माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केला?*

*तेथे जे उभे होते त्यांच्यातील कित्येकांनी ऐकून म्हटले, तो एलीयाला हाक मारितो.*

*मग त्यांच्यातील एकाने...धावत जाऊन एक स्पंज घेतला आणि तो आंबेने भरून बोरूच्या टोकावर ठेऊन त्याला चोखवयास दिला.*

*बाकीचे लोक म्हणाले, असू दे, एलीया त्याचा बचाव करितो की काय हे आपण पाहू.*

*मग येशूने, पुन्हा मोठ्याने ओरडुन प्राण सोडला*.

*तेव्हा, पाहा, पवित्रस्थानातील पडदा वरपासून खालपर्यंत फाटून दुभागला; आणि भूमी कापली, खडक फुटले;*

*...थंडगी उघडली आणि निजलेल्या पुष्कळ जणांची शरीरे उठविली गेली,*

*ते त्याच्या पुनरुत्थानानंतर, थडग्यातून निघून पवित्र नगरात गेले व अनेकांना दिसले.*

*जेव्हा शताधिपती आणि त्याच्याबरोबर येशूवर पहारा करणारे, हा भूमीकंप व घडलेल्या गोष्टी पाहून, अत्यंत भयभीत झाले, व म्हणाले, खरोखर हा देवाचा पुत्र होता.*

33 आपण प्रार्थनेसाठी फक्त काही क्षण आपली मस्तके झुकवूया.

34 प्रभु, आम्ही जाणतो की तू देव आहेस. आणि हे...हे पावन आणि पवित्र वचन वाचल्यानंतर, आपण आजही पाहू शकतो की तुझा स्वभाव बदललेला नाही. तू सदैव देव आहेस. आणि येथे असे भासते की येशूला कोणतीही मदत मिळू शकणार नाही, की

तो दुष्ट हातांनी पकडून ठार मारण्यात आला, आणि थुंकले, आणि थट्टा केली, आणि वधस्तंभावर खिळलेला, रक्तबंबाळ, मरणोन्मुख. असे दिसते की तेथे कोठेही मदत नाही, कोठेही नाही, तो स्वतः, आरोळी मारीपर्यंत, “माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केला?”

35 परंतु, तू त्या क्षणी कार्य करतो जेव्हा दुसरे काहीही कार्य करू शकत नाही. प्रभु, आम्हाला हे समजले आहे, की जर आपल्याकडे काही नद्या असतिल ज्या आपण ओलांडू शकत नाही, जर आमच्याकडे कोणतेही पर्वत आहेत जे आम्ही पार करू शकत नाही, तर देव अशा गोष्टी करण्यात पारंगत आहे ज्या इतर करू शकत नाही.

36 तू कार्य करण्यात, एक विशेषज्ञ आहेस, कारण तुला कलवरीवरील त्या दिवसाचे कारण माहित आहे. तू, देव असल्यामुळे, अनंत आहेस, तुला माहित आहे की हा समय आलाच पाहिजे. परंतु जेव्हा ते पूर्ण झाले, तेव्हा तू दर्शविले की तू देव होतास. तू कोण मालक होता हे दाखविलेस. तू पृथ्वी कंपित केली, आणि भूमीमध्ये झोपी गेलेले संत बाहेर आले. रात्रीच्या काळोखासारखा, तू सूर्याला रात्रीमध्ये काळे केलेस, दाखवलेस की तू देव होतास. पण तू इतका काळ शांत दिसत होता.

37 आपण, यावरून, हा निष्कर्ष काढतो, की, जोपर्यंत आपण देवाच्या आत्म्याद्वारे चालत आहोत, देवाच्या हाताद्वारे चालविले जातो, काहीही चुकीचे वाटत असले, तरीही आपण कलवरीकडे पाहात आहोत; देव योग्य ताशी, योग्य वेळी बोलेल.

38 आता, देव पित्या, आम्ही आमच्या पापांची आणि आमच्या अपराधांची क्षमा मागतो. आम्हाला चालविण्यासाठी तुझा आत्मा आम्ही मागतो. आमचे नेतृत्व कर, जसे कबुतर कोकऱ्याचे नेतृत्व करते. आपल्यावर काहीही गुदरो पण आपण आज्ञाधारक राहू, हे जाणून, की देव सर्व गोष्टी चांगल्या प्रकारे करतो, आणि सर्वकाही ठीक होईल हे जाणतो.

39 या सभेत आमच्या सोबत राहा. आम्ही प्रार्थना करतो की तू त्यांचे तारण कर जे वाचण्याच्या स्थितीत आहेत, आणि तारणाचा शोध करीत आहेत. त्यांना अनंतकाळाच्या जीवनाने भर, जे त्याचा शोध करीत आहेत. आम्ही प्रार्थना करतो की तू आजारी आणि पीडित लोकांना बरे कर, जे आरोग्य मिळावे, म्हणून आले आहेत. आणि आम्ही त्याबद्दल तुझी स्तुती करू. आम्ही हे तुझा पुत्र,आमचा तारणारा, येशू ख्रिस्त याच्या नावाने मागतो. आमेन.

40 आता, आज सकाळी बोलताना, आम्ही आपले लक्ष प्रचारासाठी निवडलेल्या मजकूराकडे आकर्षित करू इच्छित आहोत: *त्या दिवशी कलवरीवर*.

41 असे दिसते की हे जरासे समया बाहेर आहे; हे गुड फ्रायडेच्या दिवशी असले पाहिजे. कलवरीची आठवण दररोज केली पाहिजे. आणि आपण त्या विषयी बरेच काही ऐकले आहे, त्याबद्दल बरेच वाचलेले आहे. काळाच्या आरंभापासून, प्रचारकांनी त्यावर प्रचार केला आहे. गायकांनी, युगानुयुगे, याबद्दल गायले आहे. हे घडण्याच्या चार हजार वर्षांपूर्वी, संदेष्ट्यांनी त्याविषयी भविष्यवाणी केली होती. आणि हे घडले तेव्हा या दिवसाच्या संदेष्ट्यांनी त्याकडे पुन्हा निर्देशित केले. तो एक महत्वाचा दिवस आहे! पृथ्वीवर आतापर्यंत झालेल्या सर्व दिवसांतील हा सर्वात महत्वाचा दिवस आहे जेव्हा देवाने अरुणोदय केला.

42 आणि कलवरी, जर मानव जातीसाठी इतकी महत्वाची असेल तर, मला वाटते हे आपल्यासाठी चांगले होईल की आपण मागे जावे आणि परीक्षण करावे, पहावे की त्याचे आपणासाठी काय महत्व आहे. कारण, मला खात्री आहे की, या शेवटच्या समयात ज्यात आपण राहत आहोत, आपण देवाचे प्रत्येक महत्त्व शोधत आहोत जे आपण जाणू शकतो.

आणि जे काही आपण शोधू शकतो, त्याबद्दल जाणून घेण्यासाठी आपण येथे आहोत, हे पाहण्यासाठी की आपल्यासाठी काय आहे, आणि देवाने आपल्यासाठी काय केले आहे, आणि त्याने आमच्यासाठी काय करण्याचे अभिवचन दिले आहे. आणि यासाठीच आपण मंडळीमध्ये येतो. म्हणूनच प्रचारक प्रचार करतो, म्हणूनच तो पवित्र शास्त्राचा अभ्यास करतो आणि मनन करतो, आणि प्रेरणेसाठी शोध करतो, कारण तो देवाच्या लोकांचा सार्वजनिक सेवक आहे. आणि तो असे काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करीत आहे की जे… देव आपल्या लोकांना सांगू इच्छितो, असे काही जे त्यांना मदत करील. कदाचित, ते असे असेल, त्यांना त्यांच्या पापांबद्दल दोषी ठरवावे, परंतु त्यांना उठण्यात मदत होईल, की त्यांनी त्यांची पापे सोडावीत व मग परमेश्वराची सेवा करण्यासाठी उभे राहावे. आणि सेवकांनी या गोष्टी शोधल्या पाहिजेत.

43 आणि हा दिवस, महत्वाचा असल्याने, महान दिवसांपैकी एक, आपण त्या दिवसाच्या आपल्यासाठी असलेल्या तीन वेगवेगळ्या गोष्टी पाहू या. आपण शेकडो घेऊ शकतो. परंतु, आज सकाळी, मी फक्त तीन भिन्न, महत्वाच्या गोष्टी निवडल्या आहेत की आपल्याला, पुढील काही क्षण, कलवरीचे आपल्या साठी काय महत्व आहे त्याकडे पहायचे आहे. आणि मी प्रार्थना करतो की ते उपस्थित असलेल्या प्रत्येक पाप्याचा निषेध करील; ते प्रत्येक संतजनाला त्याच्या गुडघ्यावर घेऊन जाईल; ते प्रत्येक आजारी व्यक्तीचा देवावरील विश्वास वाढवील, आणि ते बरे होऊन, निघून जातील; प्रत्येक पापी, तारण पावलेले; प्रत्येक पतित मनुष्य परत येईल आणि स्वत:ची लाज वाटेल; आणि प्रत्येक संतजन, आनंद करील, आणि नवीन पकड आणि नवीन आशा प्राप्त करील.

44 कलवरी म्हणजे आपल्यासाठी आणि जगासाठी एक महान, महत्वाची गोष्ट, आहे, तिने एकदाचा, पाप प्रश्न सोडविला. मनुष्य पापामुळे दोषी आढळला होता. आणि पाप हा एक दंड होता जो कोणीही मनुष्य फेडू शकत नव्हता. तो दंड इतका मोठा होता की तो दंड भरण्यासाठी तेथे कोणीही नव्हते. माझा खरंच विश्वास आहे की देवाने ते त्या प्रकारे नेमले आहे, की दंड इतका मोठा असेल की कोणीही मनुष्य ती भरपाई करु शकणार नव्हता, म्हणून तो स्वत:, हे करु शकला. आता, पापाची शिक्षा मृत्यू होती. आणि आपण सर्व पापामध्ये जन्मलो, दुष्कर्मात वाढलो, खोटे बोलत जगात आलो. म्हणून आमच्यापैकी कोणीही पात्र नव्हते, किंवा त्यांना पृथ्वीवर योग्य असे कोणी सापडले नाही.

45 आणि पापाची सुरूवात पृथ्वीवर झाली नाही. पापाची सुरूवात स्वर्गात झाली. लूसी–…होता…लूसिफर, सैतान, हा पृथ्वीवर टाकण्यापूर्वी, त्याच्या आज्ञाभंगामुळे, दोषी ठरविला गेलेला प्राणी होता. पापाची सुरुवात स्वर्गात झाली, जेथे देवाने दूतांना ठेवले, आणि अशाच प्रकारे, त्याच आधारावर त्याने मनुष्याना ठेवले; ज्ञान, ज्ञानाचे झाड, जीवनाचे झाड आणि ज्ञान देणारे झाड, जेथे मनुष्य आपली निवड करू शकतो. आणि जेव्हा लूसिफरला निवड करण्यासाठी स्वामित्व देण्यात आले, त्याला देवाहून काहीतरी चांगले हवे होते. तेथून समस्येला सुरूवात झाली.

46 आणि तेथे पापाची आवश्यकता होती. मृत्यूची आवश्यकता होती. मृत्यू तर दंड होता. आणि, म्हणजेच, आपण या गोष्टींच्या अधिक तपशीलात जाऊ शकतो, कारण माझा विश्वास नाही की तेथे फक्त एकच मृत्यू आहे. तेथे एक जीवन आहे. आणि माझा असा विश्वास आहे की ज्या मनुष्याकडे अनंत जीवन आहे तो कधीही मरु शकत नाही. आणि माझा विश्वास आहे की जो आत्मा पाप करतो त्याचा पूर्ण नाश होतो, कारण बायबलमध्ये असे म्हटले आहे, "जो जीवात्मा पाप करतो, तो खचित मरेल." मनुष्य नाही; "पाप करणारा *जीव*." तर, सैतान खचित मेला पाहिजे, पूर्णपणे नष्ट केला पाहिजे. सैतान वाचला जाईल असे म्हणणाऱ्या सार्वभौमवाद्यांशी मी सहमत नाही! त्याने पाप केले,

आणि तो पापाचा स्त्रोत आहे. आणि त्याच्या आत्म्याने पाप केले; आणि तो एक आत्मा होता. त्या आत्म्याचा सर्वनाश केला जाईल, आणि त्यातून काही उरणार नाही.

47 आणि जेव्हा प्रारंभी, पाप पृथ्वीवर आले, आकाशातून पडणाऱ्या काळेपणाच्या चादरीप्रमाणे, त्याने पृथ्वीला अक्षरशः पांगळे केले. त्याने पृथ्वीवरील, सर्व प्राणी, आणि देवाची सर्व सृष्टी, गुलामगिरीत टाकली. मनुष्य मृत्यू, आजारपण, त्रास, दु:खाच्या गुलामीत होता. सर्व सृष्टी त्याच्याबरोबर पडली. पाप एक भूल देणारी गोष्ट होती ज्याने पृथ्वीला प्रत्यक्षात दुर्बळ केले. आणि मग आम्ही येथे, निराश होतो, कारण पृथ्वीवरील प्रत्येक प्राणी त्याच्या अधीन होता. आणि पृथ्वीवर जन्मलेला प्रत्येकजण त्याच्या अधीन होता.

48 म्हणून, त्यास अशा ठिकाणाहून यावे लागले जेथे पाप नव्हते. ते पृथ्वीवरून येऊ शकत नव्हते. आपल्यापैकी कोणीही दुसऱ्याची मुक्तता करू शकत नव्हता. हे दुसरीकडून आले पाहिजे होते.

49 म्हणूनच, जेव्हा मनुष्याला हे कळले की आपण आपल्या देवापासून विभक्त झालो आहे, तेव्हा तो भटकणारा बनला. ते रडले. ते ओरडले. त्यांनी परिश्रम घेतले. ते डोंगरावर आणि वाळवंटातून भटकले, ज्या शहराचा बांधणारा आणि निर्माणकर्ता देव होता, अशा शहराचा शोध घेऊ लागले. कारण, त्याला हे ठाऊक होते की जर तो पुन्हा परमेश्वराच्या उपस्थितीत परत आला, तर तो त्याच्याशी बोलू शकेल. परंतु तेथे परतीचा मार्ग नव्हता. तो हरवला होता. कोणत्या मार्गाने जायचे हे त्याला माहित नव्हते, म्हणून तो भटकणारा झाला, त्या ठिकाणी परत जाण्यासाठी एखादा मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न करू लागला. त्याच्या आतून त्याला काहीतरी सांगत होते की तो एक—एक अशा ठिकाणाहून आला आहे जी परिपूर्ण होती. येथे आज सकाळी, या दृश्यास्पद प्रेक्षकांमध्ये, किंवा चुंबकीय टेपच्या प्रेक्षकांमध्ये, एकही व्यक्ति नाही, जेथे हे जगभर जाणार आहे, येथे, किंवा कोठेही एकही नाही, परंतु जो त्या परिपूर्णतेचा शोध करीत आहे.

50 आपणास वाटते की, आपल्या कर्जाची भरपाई झालेली आहे, "ते सर्वकाही ठीक करील." जेव्हा तुमच्या कर्जाची भरपाई केली गेली, तेव्हा आपल्या कुटुंबात कोणीतरी आजारी आहे. जेव्हा आजारपण ठीक झाले, तेव्हा आपल्याला अधिक कर्ज फेडायचे आहे. आपल्याला माहित असलेली पहिली गोष्ट, आपले केस पांढरे होत आहेत आणि तेव्हा आपण परत तरूण होऊ इच्छित आहात. आणि प्रत्येक वेळेस असे काहीतरी असते, सातत्याने, आणि या पापाच्या लाटेमुळे. परंतु आपल्या अंत:करणात, कारण आपण त्याचा शोध घेत आहात, हे दर्शविते की कुठेतरी परिपूर्णता आहे. कुठेतरी, तेथे काहीतरी आहे.

51 हेच कारण आहे, की बऱ्याचदा, आजही पापी अजूनही भटकत आहे. एक सुंदर, तरुण मुलगी, लोकप्रिय होण्यासाठी, तिच्या केसांच्या बटा कापते; तिला सुंदर बनवण्यासाठी, तिचा चेहरा रंगवते; तिच्या शारीरिक स्वरूप दर्शविण्यासाठी कपडे घालते. कारण, ती एकच गोष्ट आहे जी ती शोधू शकते, तिच्याकडे परत येण्यासाठी काहीतरी, कोठेतरी शोधण्याचा प्रयत्न करते, जेव्हा ती पुरुषांना तिच्यावर शिट्ट्या मारण्यासाठी प्रवृत्त करू शकते, तिच्यासाठी हात हलविण्यासाठी, तिच्याशी प्रेमाचे चाळे करण्यासाठी. तरुण पुरुष त्याच गोष्टी स्त्रीबरोबर करील, स्वत:ला तिच्याकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न करील. शेजारी एक घर बांधतील आणि त्यास एका विशिष्ट प्रकारे निश्चित करेल, ह्यासाठी की ते त्याच्या शेजाऱ्याच्या घरापेक्षा अधिक चांगले दिसेल. हे सदैव असेच आहे, आपण काहीतरी शोधत आहोत, आणि काहीतरी त्याच्या पुढे जात आहे. त्या तरुण स्त्रीला आढळेल की तिच्यापेक्षा आणखी एक तरुण स्त्री अधिक लोकप्रिय आहे. शेजाऱ्याला

त्याच्यापेक्षा चांगले दिसणारे घर सापडेल. त्या स्त्रीला आणखी एक स्त्री आढळेल जिने काही विशिष्ट प्रकारे पोशाख केलेला आहे, ती तिच्यापेक्षा अधिक चांगली दिसते.

52 हे आपल्यामध्ये काहीतरी आहे, जे काहीतरी शोधत आहे, आणि हे दर्शविते की आपण हरवलो आहोत. आम्हाला असे काहीतरी शोधायचे आहे जे आम्हाला त्या समाधानाकडे घेऊन जाईल, ती आतली भुक क्षमविल, परंतु असे दिसते आपल्याला ते सापडू शकत नाही. मनुश्याने अनेक युगांपासून ते करण्याचा प्रयत्न केला आहे. ते त्यासाठी रडले. त्यांनी आरोळी केली. त्यांनी सर्वकाही केले जे त्यांना माहित होते की कसे करावे, परंतु तरीही त्यांना ते सापडले नाही, ते जगभरात भटकत आहेत.

53 शेवटी, एके दिवशी, तो कलवरीचा दिवस होता, तेथे गौरवातून एक खाली आला. एक, येशू ख्रिस्ताच्या नावाने, देवाचा पुत्र, जो गौरवांतून आला, व कलवरी बनवली गेली. त्या दिवशी किंमत चुकवली गेली, आणि पापाचा प्रश्न कायमचा मिटवला गेला. आणि तिने त्या गोष्टीसाठी मार्ग उघडला जिच्यासाठी आपण भुकेलेले आणि तहानलेले आहोत. तिने समाधानाचे ठिकाण आणले. तेथे कोणीही मनुष्य नाही ज्याने कधी कलवरीला भेट दिली आहे, आणि ती जशी होती तशी तिला पाहिली आहे, ती कधीही एकसारखा असू शकते. सर्वकाही ज्याची त्याने आजपर्यंत इच्छा केली किंवा अभिलाषा केली, ते मिळाले, जेव्हा तो त्या ठिकाणी पोहोचला.

54 तो एक महत्वाचा दिवस होता, आणि एक महत्वाची गोष्ट, तीने जगाला हादरवून टाकले. तिने जगाला हादरविले, यापूर्वी ते कधीच हादरले नव्हते. जेव्हा येशू कलवरीवर मरण पावला आणि पापाच्या प्रश्नाची भरपाई केली, तेव्हा या पापी जगात अंधार झाला. मध्यभागी सूर्य मावळला, त्याला चिंतेने अवकळा आली. आणि खडक हलले, पर्वतांना भेगा पडल्या, आणि कबरेतून मृतदेह बाहेर आले.

55 तिने काय केले? कलवरीवर, देव शून्य झाला. त्याने सैतान नावाच्या, प्राण्याला कायमचे जखमी केले. तेव्हापासून तो अधिक दुष्ट आहे, कारण यामुळे मानवजातीला प्रकाश मिळाला. आणि कुणालाही माहित आहे की जखमी प्राणी हा सर्वात दुष्ट आहे, त्याच्या मोडलेल्या पाठीने सभोवती रेंगाळतो. आता, कलवरीवर, सैतानाला तडाखा दिला गेला. पृथ्वीने ते सिद्ध केले.

56 आतापर्यंत दिलेली सर्वात मोठी किंमत, आणि फक्त एकच ती देऊ शकत होता, तो कलवरीवर आला आणि पूर्ण केले. येथेच मोठी किंमत दिली गेली. ही एक गोष्ट आहे. देवाला ती हवी होती. कोणीही मनुष्य लायक नव्हता. कोणीही मनुष्य समर्थ नव्हता. कोणीही मनुष्य ते करू शकला नाही. आणि देव स्वत: आला, आणि मनुष्य झाला, आणि मानवी इच्छेखाली तो मानवी जीवन जगला, व कलवरीवर वधस्तंभावर खिळला गेला. आणि तेथे, जेव्हा सैतानाला वाटले की तो ते करु शकणार नाही, तो त्यातून जाऊ शकणार नाही, तो गेथशेमेतून गेला आणि तो प्रत्येक मोह जो मनुष्यापुढे येऊ शकतो तो त्याने पेलला. सर्व लोकांप्रमाणेच तो त्यातून गेला, परंतु त्याने किंमत भरली.

57 आणि यामुळेच पृथ्वीवर अंधकार झाला. ते शस्त्रक्रियेसारखे, भूल देण्यासारखे होते. जेव्हा डॉक्टर एखाद्या मनुष्याला भूल देतात, तेव्हा ते करण्यापूर्वी, तो प्रथम त्याला बेशुद्ध करतो. आणि जेव्हा देवाने मंडळीवर ती—ती शस्त्रक्रिया केली, तेव्हा जगाला गुंगी आली, आणि निसर्गाला एक क्षोभ झाला होता. आश्चर्य नाही! देव, मानवी देहात, मरत होता. तो तोच समय होता ज्याविषयी जग वाट पाहात होते, तरीही त्यांच्यातील पुष्कळांना ते कळले नव्हते.

58 जसे आज आहे, कित्येकांनी या गोष्टी शोधल्या आहेत, आणि तरीही ते त्या ओळखत नाहीत. त्यांना बाहेर पडण्याचा मार्ग माहित नाही. ते अद्याप विलास आणि जगाच्या गोष्टी शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत, त्यांचा मार्ग शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत.

59 तेथे, त्या दिवसाला, बरीच चिन्हे दर्शवत होती, पुष्कळ महान पुर्वदर्शन. हे कोकरू, बैल, कासव आणि इतर सर्व गोष्टींनी पूर्वचित्रित केले होते, परंतु ते तोडू शकले नाहीत. ते मृत्युवरची पकड तोडू शकले नाहीत, जेथे सैतानाकडे पृथ्वी होती.

60 ते खडक आहेत ज्यावर तो एकदा चालला होता, पृथ्वीवर वर–्आणि–खाली, जेथे गंधक जळत होता! लूसिफर हा प्रभातीचा पुत्र होता, आणि जेव्हा तो ज्वलनशील ज्वालामुखी होता तेव्हा तो पृथ्वीवर चालला होता. तेच खडक थंड झाले होते, जेव्हा येशू कलवरीवर मरण पावला, ते पृथ्वीच्या बाहेर आले.

61 किंमत दिली गेली, आणि सैतानाचे बंधन तोडले गेले. देवाने मनुष्याच्या हातात ते परत दिले, ज्याचा तो फार काळापासून शोध करीत होता. यापुढे त्याला रडावे लागणार नाही. जेव्हा त्याने कलवरीवर तेथे, सैतानाचा कणा मोडला, पापाचा कणा, म्हणजे आजाराचा ही! आणि ते पृथ्वीवरील, प्रत्येक मर्त्य मनुष्यास, पापांची क्षमा करून, देवाच्या उपस्थितीत परत आणते. हालेलुया! आपल्या पापांची क्षमा झाली आहे. यापुढे सैतान आपल्याला देवापासून अंधकारात नेऊ शकत नाही.

62 तेथे एक राजमार्ग बनविला आहे. तेथे एक दूरध्वनीची सेटिंग आहे. तेथे गौरवाकडे जाणारी एक तार आहे, ती प्रत्येक व्यक्तीला त्या तारे पलीकडे पोहोचवते. जर एखादा माणूस पापांनी भरलेला असेल तर, ती त्याला मध्यभागी जोडते. त्याला त्या पापांची क्षमा केली जाऊ शकते. केवळ तेच नाही तर त्या पापाची भरपाई देखील केली जाते. ओह! "मी पात्र नाही." तुम्हाला असे म्हणण्याची गरज नाही. निश्चितपणे, नाही, आपण कधीही पात्र होऊ शकत नाही. पण जो एक समर्थ आहे त्याने तुमची जागा घेतली. तुम्ही मुक्त झाला आहात. आपल्याला यापुढे भटकण्याची गरज नाही. आपण पृथ्वीवर येथे विलासाचा शोध करणारे मनुष्य होऊ नये.

> कारण तेथे रक्ताने भरलेला झरा आहे,
> इमॅन्युएलच्या नसांपासून काढलेला,
> जेथे पापी लोक प्रवाहाखाली डुंबतात,
> त्यांचे सर्व अपराधिपणाचे कलंक नष्ट होतात.

63 आपण हरवले जाणार नाही. तेथे एक राजमार्ग आहे, आणि एक मार्ग आहे, आणि याला पवित्रतेचा मार्ग म्हणतात. अशुद्ध त्याच्यावरुन जात नाही. कारण, तो प्रथम, त्या झऱ्या मधून येतो, आणि नंतर तो त्या राजमार्गात प्रवेश करतो.

64 त्याने सैतानाची शक्ती मोडली आहे. त्याने अधोलोकातील तुरुंगाचे दरवाजे, ह्या पृथ्वीवरील, त्या प्रत्येक मनुष्यासाठी उघडले, जो ह्या तुरुंगात बंदिस्त होता, भीत होता की जेव्हा तो मृत्यू पावेल, तेव्हा त्याला कुठल्या प्रकारचे मरण येईल. कलवरीवर, त्याने त्या कोठडीचे दरवाजे उघडले, प्रत्येक अपहरणकर्त्यांना मुक्त केले. की आपल्याला यापुढे पापाने ग्रासले जाऊ नये. आपणाला यापुढे आपले अवयव पाप, मद्यपान, धूम्रपान, जुगार, खोटे बोलणे यांस सादर करण्याची गरज नाही. आपण प्रामाणिक, न्यायी आणि सरळ असू शकता. आणि सैतान त्याबद्दल काहीही करू शकत नाही, कारण युगांच्या खंडकामध्ये नांगर टाकलेली पकडून ठेवणारी जीवनरेखा आपणास मिळाली आहे. त्यापासून आपल्याला काहीही हलवू शकत नाही. कोणतेही वारे तुम्हाला हलवू शकत

नाहीत. काहीही नाही, अगदी मृत्यूसुद्धा नाही, आपल्याला ख्रिस्त येशूमध्ये असलेल्याना देवाच्या प्रीतीपासून विभक्त करू शकत नाही. हाच कलवरीचा अर्थ आहे.

65 गुलाम असलेल्या पुरुषांना मुक्त करण्यात आले. कारण ते मुक्त आहेत एकेकाळी मृत्यूची भीती बाळगणारे पुरुष यापुढे मृत्यूला घाबरत नाहीत. एक मनुष्य जो त्या नगराची वाट पाहतो, ज्याचा बांधणारा आणि निर्माणकर्ता देव आहे, तो राजमार्गावर पाऊल टाकू शकतो, आणि आपले मुख स्वर्गाकडे लावू शकतो, कारण तो मुक्त झाला आहे. हालेलुया! तो मुक्त केला गेला आहे. त्याला यापुढे भटकण्याची गरज नाही, कारण आपण बरोबर आहात की नाही हे जाणून घेण्याचा तेथे एक मार्ग आहे. देव आपल्याला जीवन देतो. आपली पापे निघून गेलेली आहेत. त्या दिवशी कलवरीवर किंमत चुकवली गेली आहे. जेव्हा आपण ते सर्व पाहतो, आश्चर्य नाही की कवीने लिहिले:

> मध्यभागी ठेवलेले खडक आणि गडद आकाश
> माझा तारणाऱ्याने त्याचे डोके झुकविले आणि मरण पावला.
> प्रारंभीच्या पडद्याने मार्ग प्रगट केला
> स्वर्गातील आनंद आणि अविनाशी दिवसाकडे जाण्याचा.

66 अब्राहामाला शहर शोधण्यासाठी, देशभर, भटकण्याची गरज नाही. पाप्याला आश्चर्यचकित होण्याची गरज नाही, की तो वाचला जाईल किंवा नाही. आजारी माणसाला आश्चर्य वाटण्याची गरज नाही की तो बरा होऊ शकतो किंवा नाही. प्रारंभीच्या पडद्याने, त्या दिवशी कलवरीवर, संपूर्ण विजयाचा मार्ग प्रकट केला. या सर्व गोष्टींवर विजय मिळविण्यासाठी, देवाने आपल्याला त्याच्या आत्म्याची शक्ती दिली आहे; आम्हाला फक्त त्यावर विश्वास ठेवण्यास सांगत आहे. त्या दिवशी कलवरीवर हे घडले. त्या सारखा दिवस कधीच झाला नव्हता. त्या सारखा दिवस कधीही होणार नाही. यापुढे त्याची आवश्यकता नाही. किंमत दिली आहे, आणि आपली मुक्तता केली गेली आहे. देवाचे आभार! आमची सोडवणूक झाली आहे. आपल्याला याबद्दल आश्चर्य वाटण्याची गरज नाही. याबद्दल अधिक अंदाज लावण्यासारखे आणखी काही नाही. ते सर्व काढून घेतले आहे. आच्छादनाने पडदा पुन्हा काढला आहे, आणि आम्ही राजमार्गावर बसलो आहोत, यापुढे आश्चर्य वाटण्यासारखे नाही, तर विश्वास ठेवा आणि फक्त पुढे जा. आपण अगदी ईश्वराच्या उपस्थितीत जातो.

67 अब्राहामाला माहित होते, आणि इतरांना ते ठाऊक होते, की ते जरी नगर शोधत होते, तरी त्यांना माहित होते की ते कुठूनतरी आले आहेत. काहीतरी घडले होते. ते एका पक्षघाताने हादरलेल्या पृथ्वीवर राहत होते. भूकंप आले. वादळ येतात. युद्धे आणि हिंसा! लांडगा आणि कोकरू एकमेकांना खात आहेत, किंवा लांडग्याला कोंकरा खातो, आणि सिंह बैल खातो. ते योग्य दिसत नाही. तेथे काहीतरी चुकीचे आहे. त्याला माहीत होते तेथे काहीतरी चुकीचे होते. पुरुष आणि भाऊ भावाला मारत आहे; वडिल मुलाला मारत आहे, मुलगा बापाला मारत आहे. तेथे काहीतरी चुकीचे आहे. तो म्हातारा होत आहे. तो मरत आहे. तो कमजोर होत आहे. आजारपण त्याच्यावर आहे. तो बंधनात आहे. झाडे वाढतात, पण अमर नाहीत. ते मरतात. पर्वत बदलतात. समुद्र कोरडे पडतात. नद्या सुखतात. त्याला माहित होते की तेथे काहीतरी चुकीचे आहे. आणि त्याने असे ठिकाण शोधले, एक नगर जेथे असे कधी घडले नाही. त्याला माहित होते, की जर तो पुन्हा एकदा त्याच्या उपस्थितीत गेला ज्याने ते ठीक केले आहे, तर तो त्याच्याशी बोलू शकेल.

68 अरे, पाप्या, आज सकाळी, किती भाग्य आहे! हे जाणून घेणे की आता तुला हा मार्ग मिळाला आहे. त्या दिवशी कलवरीवर मार्ग खुला केला. कारण त्या सर्व पूर्वजांनी त्याचा

शोध केला व त्यासाठी मागणी केली, कलवरीने आपल्याला ते विनामूल्य दिले. आपण ते कसे सोडू शकतो? संप्रदायात सामील होण्यासाठी, आपण ते कसे नाकारणार? जगाच्या सुखसोयीसाठी, त्यास कशाला तरी पर्याय देण्यास, आपण त्यास कसे मागे टाकाल? का ते स्विकारीत नाही? पडद्याचे उघडणे मनुष्याला, त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचे, पाप न लादता, थेट देवाच्या उपस्थितीत परत आणते. आणि ज्या गोष्टींचा तो शोध घेत आहे, त्यासाठी त्याच्या समोर एक मार्ग तयार करतो: स्वर्ग, वैभव, शांती, अनंतकाळचे जीवन, सर्व काही त्याच्या समोर.

69 तो दिवस म्हणजे ते—ते सैतानाचे सामर्थ्य मृत्यूद्वारे नष्ट केले. त्याने सर्वकाही समाप्त केले.

70 आणि मी त्याला तेथे पाहू शकतो; जो त्या प्रथम छायातून आला, तो एदेनेचा कोकरा होता.

71 जेव्हा हाबेलाने, विश्वासाने, काईनापेक्षा अधिक चांगला यज्ञ देवाला अर्पण केला, त्याने कोकऱ्याच्या मानेवर एक—एक द्राक्षाची वेल बांधली असावी, त्याला खडकापर्यंत ओढत नेले असेल. त्याच्या हातात एक—एक खडक घेतला, एका सुऱ्यासाठी, आणि त्याचे डोके थोडे मागे खेचले, आणि तो मरेपर्यंत त्याला चिरले आणि त्याचे तुकडे केले. आणि त्याच्या स्वत:च्या रक्ताने त्याची लोकर धुतली. तो त्याच्या रक्तात लोळला. ती छाया होती.

72 परंतु कलवरीच्या दिवशी, तेथे या पृथ्वीवरील कोकरू नव्हते, पण तो देवाचा कोकरा, मरत होता, त्याच्या स्वतःच्या रक्तामध्ये लोळत होता. त्याचे तुकडे करण्यात आले, आणि कापण्यात आले, मारण्यात आले, आणि त्याच्यावर थुंकण्यात आले, टीका करण्यात आली, थोबाडीत मारण्यात आले, आणि सर्व काही, त्या जगाद्वारे, आणि त्याचे रक्त त्याच्या केसांवरून गळत होते.

73 जेव्हा हाबेलाचे कोकरू मरण पावले, ते मरण पावले, ते अशा भाषेत बोलत होते जे हाबेल समजू शकला नाही. ते केकाटत होते.

74 आणि जेव्हा त्या दिवशी कलवरीवर देवाचा कोकरा मरण पावला, तो त्या भाषेत बोलला त्याला कोणीही समजू शकले नाही. “माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?” तो देवाचा कोकरा होता, त्याचे तुकडे तुकडे केले गेले, कापले गेले.

75 हा तोच कोकरा होता जो हाबेलाच्या विचारांमध्ये होता, जेव्हा त्याने त्या स्त्रीची अभिवचनाची संतति पाहिली. हा तोच कोकरा होता जो दानीएलाने पाहिला, जो हा कोणाचाही हात न लागता, पर्वतांतून निघाला होता. संदेष्ट्यासाठी, तो चाक होता जे चाकाच्या मध्यभागी होते. त्या सर्वांनी जे काही आगाऊ पाहिले होते, ते त्या दिवशी कलवरीवर, पूर्ण झाले. त्यातून महान गोष्ट समोर आली. यामुळे सैतानाची कंबर मोडली.

76 प्रथम, आपण त्या दिवसाचा अर्थ काय ते शोधायला हवे. दुसरे म्हणजे, त्या दिवसाने आपल्यासाठी काय केले, आता, आपल्यासाठी काय केले हे आपण पाहिले पाहिजे. आता, तिसरे, त्या दिवसासाठी आपण काय केले पाहिजे ते पाहू या. आपण काय केले पाहिजे?

77 प्रथम, आपण त्याकडे लक्ष दिले पाहिजे, कारण तो एक महान दिवस आहे, सर्व दिवसांपेक्षा फार महान आहे. पापाची किंमत चुकवली गेली. सैतानाची शक्ती मोडली होती.

78 आणि आता आपण त्या बदल्यात काय केले पाहिजे हे आपल्याला पहायचे आहे. आता त्या बदल्यात, त्या दिवशी कलवरीवर, जेव्हा येशू कलवरीवर मरण पावला, तेव्हा

त्याने केवळ आपल्या पापांसाठी किंमत दिली नाही, परंतु त्याने किंमत देखील मोजली आणि एक मार्ग बनविला ज्याद्वारे आपण त्याला अनुसरु शकू; कारण आपण, एक पतीत आदामाचे म्हणून, मुक्ती पावलेलो होतो. जसे आत्म्याने आदामाचे (पहिला आदाम) आत्म्याद्वारे नेतृत्व केले, ज्याला सर्व सृष्टीवर सत्ता दिली होती, तर मग आपण (दुसरा आदाम), किंवा कलवरीच्या दिवसापासून, पृथ्वीवरील लोक जे ख्रिस्ताद्वारे सोडविले गेले आहेत, त्याला अनुसरू शकतात. आता, जेव्हा तो कलवरीवर मरण पावला, तेव्हा त्याने एक मार्ग तयार केला. त्याने तो आत्मा, पवित्र आत्मा दिला, त्याने त्याला पृथ्वीवर परत पाठविले, तुमच्यासाठी व माझ्यासाठी की आपण त्याद्वारे जगावे. हाच कलवरीचा आपल्यासाठी अर्थ आहे, की त्याला अनुसरणे.

79 प्रथम, त्यात पहा, आमच्यासाठी त्याने काय केले ते पहा. आणि आता आपण यासंदर्भात काय केले पाहिजे? आपण आणि मी काय केले पाहिजे?

80 आता, आम्ही म्हणतो, "ठीक आहे, मी—मी त्याचे कौतुक करतो. खूप छान आहे." पण आपण ते स्वीकारले पाहिजे. आणि ते स्वीकारणे म्हणजे, आपल्या अंतःकरणात त्या व्यक्तीला, ख्रिस्ताला स्वीकारणे होय.

81 तेव्हा, आपण पापापासून मुक्त आहोत, म्हणून आपल्यावर पापाचे कोणतेही बंधन नाही, मुळीच नाही. जणू काही आपण कधीच पाप केले नाही, देव जो, परिपूर्ण अर्पण त्याने आपणास परिपूर्ण केले. कारण, येशू म्हणाला, "जसा तुमचा स्वर्गातील पिता परिपूर्ण आहे, तसे तुम्हीही परिपूर्ण व्हा." तर, अजून काही करण्याची गरज नाही, परंतु आपल्याला देवाच्या उपस्थितीत परिपूर्ण केले आहे.

82 आता, तेथेच आपण आपले स्थान गमावतो. जर आपण ते पाहत नाही, आपण मागे काय होतो ते पाहण्याचा प्रयत्न करतो. आणि जोपर्यंत आपण मागे काय होतो त्याकडे पाहतो, त्या बलिदानाचा आपल्यासाठी काहीच अर्थ उरत नाही. अरे, आपण ते पाहू शकत नाही, मंडळी? [मंडळी म्हणतात, "आमेन."—सम्पा.] मी नाही...मी तसे करण्याचा प्रयत्न करणार नाही. मी करू शकत नाही, आणि आपणही करू शकत नाही. तेथे प्रयत्न करण्याची गरज नाही. आपण काय केले ह्याकडे जोपर्यंत आपण पाहातो तोपर्यंत आपण गमावलेले आहोत. परंतु आपण काय केले हया कडे पाहू नका.

83 त्या दिवशी कलवरीने आपल्यासाठी काय केले ते पहा. तिने आपली किंमत दिली आहे. तिने प्रश्न सोडवला. "तुमची पापे जरी लाखेसारखी लाल असली; तरी ती बर्फासारखे पांढरी होतील. किरमिजा सारखी लाल असली; तरी लोकरी सारखी पांढरी होतील." मग आपणाकडे कोणतेही पाप राहत नाही. आपण पूर्णपणे पापरहित आहात. आपण काय केले, किंवा आपण काय करता, हे महत्त्वाचे नाही, तरीही आपण पापरहित आहात. जोपर्यंत आपण येशू ख्रिस्ताला आपला तारणारा म्हणून स्वीकारले आहे, तोपर्यंत आपल्या पापांची क्षमा झाली आहे. काहीही *माफ* केलेले "नष्ट केले जाते आणि त्याबद्दल आठवणही राहत नाही."

84 मग ते काय करते? त्या परिस्थितीनंतर, तो आपल्याला, त्याचा आत्मा, त्याला अनुसरण्यास, आणि जसे त्याने केले तसे करण्यासाठी देतो, अशा इतरांनाही जे त्याचे अनुसरण करत आहेत. तो फक्त एक मनुष्य, परिपूर्ण मनुष्य होता. त्याने आपले जीवन दिले, आणि त्याने आपल्यासाठी एक कित्ता बनविला. आता आपण काय केले पाहिजे?

85 आता, प्रथम मला सांगायचे आहे की, येशू कधीही स्वतःसाठी जगला नाही. त्याचे जीवन इतरांसाठी होते. तेच, परिपूर्ण, अनंतकाळचे जीवन आहे. जेव्हा आपण म्हणता आपण चर्चमध्ये जातो, आणि आपण चांगल्या गोष्टी करतो, ते ठीक आहे. परंतु जेव्हा

आपण आपले जीवन स्वतःसाठी जगता तेव्हा आपण सार्वकालिक जीवन प्राप्त करू शकत नाही. सार्वकालिक जीवन, म्हणजे इतरांसाठी जगणे. ते सिद्ध झाले जेव्हा ते देवाच्या कोकऱ्यामध्ये आले. तो जगला, आणि त्याच्याजवळ अनंतकाळचे जीवन होते, कारण तो स्वत:साठी जगला नाही. तो इतरांसाठी जगला. आणि आपण त्या दिवसाला प्राप्त करण्याद्वारे, अनंतकाळचे जीवन प्राप्त करता, आणि आपण यापुढे आपल्यासाठी जगत नाही. आपण इतरांसाठी जगता.

86 कोणीतरी म्हणाले, "आपण कसे उभे राहू शकाल, कोणीही आपल्याला अशा वाईट नावांनी बोलवू द्या?" आपण स्वतःसाठी जगत नाही. आपण इतरांसाठी जगता, यासाठी की आपण त्या मनुष्याला मुक्त करावे. आपण पुत्र बनला. आणि हयात समस्या ही आहे की, मंडळी विसरली आहे की ते पुत्र आहेत. आपण पुत्र आहात. आपण ख्रिस्ताचे स्थान घेत आहात. आपण पुत्र आहात, म्हणून स्वत:साठी जगू नका. इतरांसाठी जगा.

87 "बरं, भाऊ ब्रॅन्हम, मी *ह्या* भावासाठी जगू शकतो, कारण तो खात्रीने एक चांगला मनुष्य आहे." ते असे नाही.

88 तुमचा तिरस्कार करणाऱ्या माणसासाठी जगा. त्या व्यक्तीसाठी जगा, जे शक्य असेल तर तुम्हाला मारू शकतील. त्यांनी त्याच्याशी तसेच केले. त्यांनी त्याला जिवे मारले, आणि तो मेला, की त्याने त्यांचे तारण करावे. हे अनंतकाळचे जीवन आहे. जेव्हा, आपण, ते आपल्या हृदयात वागवितो, तेव्हा स्वर्गाचा सामना करु शकू. पण तुम्ही स्वत:च्या वस्तूंचा त्याग करता, त्या सोडून देता, जसे मेंढरे आपली लोकर देतात. आपण कलवरीकडे, पहाता.

89 मला आशा आहे की हे आपल्याला एका ठिकाणी जाण्यास मदत करते. तेच प्रार्थनामंदिर आहे, तेच सर्व लोकांनी, केले पाहिजे, आपण काय आहात आणि काय हेतू आहे हे शोधले पाहिजे. चर्च, म्हणजे केवळ संगीत वाजवण्यासाठी, गाणी गाण्यासाठी चर्चला जाणे नाही. चर्च ही अशी जागा आहे जेथे सुधारणूक केली जाते. "न्यायाचा प्रारंभ देवाच्या घरात होतो."

90 "आपण स्वतःला ख्रिस्तासाठी मृत, आणि ख्रिस्तासाठी जिवंत असे गणले पाहिजे." मग, त्याने मार्ग तयार केला की आपण स्वत:ला त्याच्या सेवेसाठी, त्याला अनुसरण्यासाठी अर्पण करू शकतो. जर आपण त्याचे अनुसरण केले, तर आपण ते जीवन जगू जे त्याने जगले. ते अद्भुत आहे.

91 येशू म्हणाला, आणि याबद्दल बोलला. मला तूम्हाला त्यावर काही संदर्भ देऊ द्या. लक्षपूर्वक ऐका. हे चुकवू नका. येशू म्हणाला, त्या दिवशी तो लोकांना वेगळे करील, जसे मेंढरे व शेरडे. आणि तो शेरडांस म्हणेल, "डाव्या बाजूला उभे राहा." आणि मेंढरांना, "उजवीकडे उभे राहा."

92 मग तो शेरडांस म्हणाला, "माझ्यापुढून निघा. कारण, मी भुकेला होतो, पण तुम्ही मला खावयास दिले नाही. मी तुरूंगात होतो पण तुम्ही माझ्या भेटीला आला नाही. मी उघडा होतो, आणि तुम्ही मला वस्त्र दिले नाही. मी तान्हेला होतो, आणि तुम्ही मला प्यावयास पाणी दिले नाही. मी आजारी होतो, आणि तुम्ही मला भेट दिली नाही. तर मग माझ्यापूढून निघून जा."

93 आणि मेंढरांस, तो म्हणाला, "मी भुकेला होतो तेव्हा तुम्ही मला खावयास दिले. मी उघडा होतो, आणि तुम्ही मला वस्त्र दिलेत. मी आजारी होतो, आणि तुम्ही माझी सेवा केली."

94 आणि लक्षात घ्या. मंडळी, हे समजण्यात चूक करू नका. हे कायम आपल्या मनात ठेवा. ते इतके अजाणतेपणे केले होते! लोक हे कर्तव्य दक्षतेसाठी करत नाहीत. एक मनुष्य जो आपल्याला काहीना काही तरी देतो, कारण त्याने ते करणे आवश्यक आहे, एक मनुष्य जो आपल्याला भोजन देतो कारण त्याने ते केले पाहिजे, त्याच्याकडे एक स्वार्थी कल्पना आहे. ते तुमचे जीवन, तुमचे कार्य असावे.

95 या मेंढरांना आश्चर्य वाटले, की ते म्हणाले, "प्रभु, तू कधी भुकेला होतास? आणि आम्ही तुला खावयास दिले नाही...आम्ही तुम्हाला केव्हा भुकेले पाहून खावयास दिले? केव्हा तू नग्न होतास आणि आम्ही तुला कपडे दिले? तू केव्हा तान्हेला होतास, आणि आम्ही तुला प्यावयास दिले? तू केव्हा आजारी होतास, आणि आम्ही तुझी सेवा केली?"

96 हे प्रेमामुळे आपोआपच होते, फक्त आपले जीवन त्यांच्यात जगलो. देवा, लोकांना कळू दे की कलवरीने आमच्यासाठी काय केले, किती आपोआपपणे.

"प्रभू, आम्ही कधी केले? आम्हाला ते कधीच माहित नव्हते."

97 पाहा येशू वळला व काय म्हणाला, "तुम्ही या गोष्टी त्यांच्यासाठी केल्या, त्याअर्थी ते माझ्यासाठी केले आहे."

98 निःस्वार्थ जीवन; दुसरा विचार नाही. याबद्दल विचार करण्याची गरज नाही; परंतु आपण या जगाच्या गोष्टींसाठी मेलेले आहात, आणि म्हणून ख्रिस्तामध्ये जिवंत आहात, आणि म्हणून राजमार्गा वर चालत आहात, या गोष्टी फक्त एक स्वयंचलित गोष्टी आहेत. आपण फक्त ते करता. असे म्हणत नाही की, "ठीक आहे, आता, प्रभु करीन, प्रभु, मी असे करावे अशी इच्छा आहे." हे तसे नाही. आपण फक्त त्याचाच एक भाग आहात. त्याचा आत्मा तुमच्यात आहे, आणि तुम्ही त्याच्या वागण्याप्रमाणे वागता. होय! तुम्हाला ते समजले.

99 "एखादा मार्ग मनुष्याला चांगला भासतो, पण त्याच्या शेवटी मृत्यूपथ फुटतात."

100 "प्रभु, प्रभु, असे म्हणणाऱ्या सर्वांचा आत प्रवेश होणार नाही, परंतु त्यांचा होईल जे माझ्या पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतात," फक्त त्यांच्या हृदयातून, फक्त मुक्तपणे.

101 आता, कलवरीवर त्या दिवसाने ती किंमत दिली, जेणेकरून आपण तसे होऊ शकू.

102 असे म्हणू नका, "तुम्हाला माहिती आहे, विधवा जोन्स एकदा...तिच्याकडे कोळसे नव्हते, आणि मी जाऊन तिच्यासाठी काही कोळसे विकत घेतले. मी तुम्हांस सांगतो, मी एका भावाला पाहिले ज्याला कपड्यांचा सूट पाहिजे होता, आणि मी गेलो आणि त्याला एक कपड्यांचा सूट दिला. देवाचा धन्यवाद होवो! मी एक ख्रिस्ती आहे." अरे बाप रे! आपण स्वार्थी, गरीब, दयनीय व्यक्ती आहात. तुम्ही ढोंगी आहात.

103 "डावा काय करीत आहे हे उजव्या हाताला कळू देऊ नका, आणि उजवा काय करीत आहे हे डाव्या हाताला कळू देऊ नका." काही झाले तरी जेव्हा आपण हे करता, तेव्हा आपण ख्रिस्तामध्ये आपोआप मरता. हा तुमचा स्वभाव आहे. ती तुमची मनोरचना आहे. कशाही प्रकारे, तुम्ही ते करता. हे एक जीवन आहे जे तुमच्या मध्ये राहात आहे. आपण पूर्णपणे त्या आत्म्याला शरण गेलेले आहात, आणि तो स्वतः आपल्यामध्येच राहतो. ओह, तुम्ही त्या धन्य आत्म्याचा अनुभव घेत आहात, त्या जीवनाचा! पौल म्हणाला, "मी जगतो असे नाही, तर ख्रिस्त माझ्याठायी जगतो," इतके स्वयंचलित.

104 "बरं, मी तुम्हाला सांगतो, बंधू ब्रॅन्हम, आपण येथे ख्रिस्ती आहोत. आपण *या* लोकांना मदत करतो. आपण *त्या* लोकांना मदत करतो." अरे बाप रे! तुमची लाज वाटते. ते ख्रिस्तीत्व नाहीए.

105 ख्रिस्तित्व आपोआप मिळते. ते केले पाहिजे. आणि आपण त्याविषयी विसरून जाता, त्या सर्वाविषयी, “मी नाही” जा, ते करा.

106 ख्रिस्ताने आपले जीवन पूर्णपणे देवाला समर्पित केले. त्याने स्वत:ला जनसेवक, म्हणून लोकांना दिले. त्याने आपले जीवन, मुक्तपणे दिले. त्याला ते करण्याची गरज नव्हती. ते त्याने नाखुशीने केले नाही. तो असे म्हणाला नाही, “आता, बंधूंनो, तुम्ही सर्वांनी माझ्याबद्दल पूर्ण विचार केला पाहिजे, कारण मी तुमच्यासाठी मरण्यास आलो आहे.” त्याने याबद्दल कधीही एक शब्द बोलला नाही. तो मेला, कसलीही तमा न बाळगता, कारण त्याच्यामध्ये देव होता.

107 तो देव तुमच्यामध्ये आहे, तो देव माझ्यामध्ये आहे, ज्यामुळे आम्हाला इतरांकडे पाहण्याची संधी मिळते. मेंढरे, एका बाजूला.

108 त्यातील एक म्हणेल, “प्रभु, मी *हे* केले. आणि, प्रभु, मी *ते* केले.”

109 तो म्हणाला, “अनाचार करणाऱ्यांनो, माझ्यापासून निघून जा. माझी तुमच्याशी कधीच ओळख नव्हती.”

110 जर मंडळी त्या मूलभूत गोष्टींकडे येऊ शकली असती, ते असे काही नाही जे आपण करण्याचा प्रयत्न करतो, ते आपण स्वत:हून करिता. हे असे काहीतरी आहे जे तुमच्यामध्ये जन्मले आहे.

111 माझ्या पेन्टेकोस्टल मित्रा, मला माफ कर. मी पेन्टेकोस्टल आहे. परंतु माझे पेन्टेकॉस्टल मित्र तेथे पोहोचले आहेत, जेथे एक—एक बरेच वेगवान संगीत असायला हवे, वाजवण्याकरिता काही वाद्यवृंद, किंवा टाळ्या वाजवणे, किंवा डफ वाजवणे, आवाज वाढविण्यासाठी. ती फक्त एक भावना आहे. ते लढाईला जाण्यापूर्वी वाद्य वाजवतात. ते लोकांना लढाईच्या भावनेत आणतात. माझा संगीतावर विश्वास आहे. टाळ्या वाजवण्यावर माझा विश्वास आहे. परंतु मी ह्या गोष्टींवर विश्वास करतो. ते अगदी खरं आहे. आपल्याला ते करणे आवश्यक आहे.

112 परंतु तू त्या महान गोष्टीं न करता सोडून दिल्या आहेत, ते आत्मत्यागाचे जीवन आहे की देव तुझ्यामध्ये राहतो, आपोआप जे योग्य आहे ते करीत आहे कारण ते बरोबर आहे. केवळ चालत राहा, त्याबद्दल काही विचार करु नका. फक्त ते जगत राहा. नंतर पहा, आपण काय चालू आहे ते पहा. आपण फक्त...आपण नाही...आपण राजमार्गावर आहात. कलवरीने आपल्यासाठी तेच केले आहे, त्या दिवशी आपल्यासाठी तो राजमार्ग उघडला.

113 आता, लक्षात ठेवा, आपण अर्धी शेळी आणि अर्धी मेंढी असू शकत नाही. ते मिसळणार नाहीत.

114 आता, बरेच लोक म्हणतात, “हो, आपल्याला माहित आहे काय? आमच्या समूहामध्ये एक संस्था आहे. आम्ही, आम्ही गरिबांना मदत करतो. आम्ही हे करतो.” हे सर्व ठीक आहे, परंतु आपण आपल्या स्वत:चा भोंगा वाजवता. आपण तसे करु नका.

115 “तुम्ही तुमचे दान गुप्तपणे करा,” येशू म्हणाला. फक्त स्वयंचलितपणे, आपल्यासाठी काहीतरी, जाणे, पाणी आणणे यापेक्षा अधिक नाही. आपण तहानलेले आहात. जर पुढील मनुष्य तहानलेला असेल, तर आपण त्याच्या बद्दल देखील विचार करता. पुढील मनुष्याला गरज आहे, आपण आपल्या स्वतःच्या गरजेप्रमाणेच त्याच्याबद्दलही तसाच विचार करता. आणि याकडे लक्ष देऊ नका. फक्त जगत राहा.

आता, आपण अर्धी मेंढी आणि अर्धी बकरी असू शकत नाही.

116 म्हणून जर आपण असे म्हणता, "ठीक आहे, आमच्या मंडळीची एक संस्था आहे. आम्ही गरिबांना देतो, आम्ही *हे* करतो, आणि *ते* करतो आणि *इतर* गोष्टी करतो."

117 जर तुमच्याकडे, ख्रिस्ताच्या जीवना खेरीज इतर गोष्टी आहेत, तर तुम्ही ते व्यर्थ करीत आहात. येशू...पौल म्हणाला, पहिले करिंथकरांस पत्र 13, "मी आपले सर्व धन अन्नदानार्थ दिले आणि मी आपले जीवंत शरीर जाळण्यासाठी दिले, तरी मला काही लाभ नाही."

118 आता, हे कठीण आहे, परंतु ते सत्य आहे. आपण त्या वास्तविकतेकडे आले पाहिजे, कलवरीने आपल्यासाठी काय केले हे समजून घ्या. आम्ही त्याकडे पाहतो आणि म्हणतो, "होय, ते चांगले आहे." ते ते नाही. जर देवाच्या पुत्राला वधस्तंभावर खिळण्यासाठी कलवरीवर जावे लागले तर त्याच्याकडे येणारा प्रत्येक मुलगा कलवरीकडे गेला पाहिजे. त्याच्याकडे कलवरी देखील असली पाहिजे. आपणाकडे कलवरीचा दिवस असला पाहिजे. माझ्याकडे तो कलवरीचा दिवस आहे. तिने पापाचा प्रश्न मिटवला. प्रचारकाशी हात मिळविल्याने नाही; चर्चमध्ये जाण्याने नाही; मी पत्राद्वारे आत आलो नाही; व्यवसायाने आत आलो नाही. पण जन्म पावल्याद्वारे आत आलो. त्याने कधीही पत्र दिले नाही. त्याने कधीही व्यवसाय दिला नाही. त्याने जन्म दिला. अशाप्रकारे आपण आत आला. मग, तेव्हापासून, आपोआप आपण ख्रिस्ती जीवन जगत आहोत.

119 आता, आणखी एक टिप्पणी. अर्धी बकरी, अर्धी मेंढी, त्यांना अशा गोष्टींची गरज नाही. तुम्ही एकतर बकरी आहात किंवा मेंढी आहात. तुम्ही अर्धी बकरी आणि अर्धी मेंढी नाही. तुम्ही एकतर बकरी किंवा मेंढी आहात.

120 आता, जर आपण फक्त चांगल्या गोष्टी करता, आणि आपल्याला असे वाटते की त्याद्वारे, आपण त्यात प्रवेश करू शकतो, तर तेथे कलवरीचा दिवस असण्याची गरज नव्हती. नियमशास्त्राने ती तरतूद केली आहे. पण, त्याने तो कलवरीचा दिवस घेतल्याने, त्यास त्यामध्ये आणायचे होते, आपण केवळ मंडळीचे सदस्य होऊ नये, तर देवाचे पुत्र व कन्या बनावे. कलवरीचा दिवस असाच होता. आपल्यासाठी तो यासाठी होता, की आपण येशूसारखे करावे आणि त्याला अनुसरावे, आणि येशूसारखे वागावे.

121 आता, नदी एकाच वेळी वर आणि खाली वाहत नाही. नदी फक्त एकाच मार्गाने वाहते. आणि देवाचा आत्मा फक्त एकाच मार्गाने जातो. तो त्यासह गोष्टी मिसळत नाही. त्याच मार्गाने जातो.

122 बंद करताना, येशूला पहा. येशूने म्हटले, "मी जी कामे करतो ती तुम्हीही कराल, आणि त्याहीपेक्षा मोठी कराल, कारण मी माझ्या पित्याकडे जातो."

123 मी हे सगळे इथल्या मंडळीसाठी बोलत नाही. आपण समजत आहात. पण हे संदेश टेप केले जात आहेत. जगभरातील हजारो लोक, ते ऐकतात.

124 मी आता, समीक्षकांसाठी त्या प्रश्नाचे उत्तर देणार आहे. मला बऱ्याचदा सांगितले जाते...सांगितले जाते. ते म्हणतात, "तुम्ही बायबलवर का विश्वास ठेवता? येशूने म्हटले, 'मी जी कृत्ये करतो ती तुम्हीही कराल, आणि त्यापेक्षा मोठी करील, कारण मी माझ्या पित्याकडे जातो.'"

125 महोदय, आपणाला किती वाईट मिळू शकते? आपल्या बौद्धिक देवविषयक ज्ञानासह, आपण पारखकरण्यापासून किती दूर भटकू शकतो, तुमच्या कुठल्याही मानसिक संकल्पना घेऊन? माझ्या दयाळू आणि हरवलेल्या मित्रा, हे तू समजू शकत नाही काय की हया बायबलचा अर्थ आध्यात्मिक रीतीने लावला गेला आहे?

126 येशूने पित्याचे आभार मानले की त्याने हे ज्ञानी, आणि विचारवंत, आणि शहाणे व हुशार लोकांकडून लपवून ठेवले आहे, आणि ते कलवरीकडे येणाऱ्या बाळकांना प्रकट केले आहे.

127 आता पहा. येशू म्हणाला. त्याने हे कसे सांगितले ते पहा. "मी जी कृत्ये करतो," तो आत्ताच ती करत आहे. "जी कृत्ये मी आता करीत आहे, आजारी लोकांना बरे करणे, मेलेल्यांना उठवणे, अंधांचे डोळे उघडणे, ही कृत्ये तुम्हीही कराल. तुम्ही ती कराल जर तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवाल. तुम्ही ही कामे करता. आणि त्यापेक्षा मोठी तुम्ही कराल, कारण मी आपल्या पित्याकडे जातो."

128 "आता थोडाच वेळ आहे, आणि मग जग मला आणखी पाहणार नाही, परंतु तुम्ही मला पाहाल. मी जगाच्या अंतापर्यंत, तुम्हाबरोबर राहीन, तुम्हामध्ये राहीन. मी तुम्हाला अनाथ असे सोडणार नाही. मी पित्याला विनंती करीन; तो तुम्हाला दूसरा कैवारी म्हणजे पवित्र आत्मा पाठवील, जग त्याला ग्रहण करू शकत नाही; तरीही, आपण त्याला ग्रहण करू शकता."

129 आता लक्षात घ्या. "मोठी" कृत्ये, म्हणजे मंडळी मध्ये सामर्थ्य असणे, केवळ प्रार्थनेने आजारी लोकांना बरे करण्यासाठीच नव्हे, प्रार्थना करून भुते काढणे नव्हे, परंतु विश्वासणाऱ्याना अनंतकाळचे जीवन देणे. पवित्र आत्मा येणार होता, आणि जीवन देण्यासाठी मंडळीच्या स्वाधीन दिला गेला. अरे! हाच कलवरीचा अर्थ आहे. त्याने धिक्कारलेले, हीन पुरुष व स्त्रिया घेतल्या, आणि त्यांना देवाचे पुत्र व कन्या होण्याकरिता वर उचलले, यासाठी की आजारी लोकांना बरे करावे आणि अनंतकाळचे जीवन दयावे; आज्ञाधारक विश्वासणाऱ्याना पवित्र आत्मा द्यावा, जे लोक एकेकाळी अविश्वासी होते, त्यांना विश्वासू बनविण्यात आले, आणि त्यांना आत्मिक, अनंतकाळचे जीवन देण्यात आले.

130 हे किती मोठे आहे: असे म्हणणे की, "ही आजारी स्त्री येथे पडलेली आहे, मी विश्वासाची प्रार्थना करू शकतो आणि ती बरी होईल," हीच एक मोठी गोष्ट आहे, जी तो त्या वेळी करीत होता; "परंतु," म्हणाला, "यापेक्षा मोठी तुम्ही कराल; मी तुम्हाला सामर्थ्य देणार आहे, त्याला फक्त थोडा वेळ उठवण्यासाठी नाही, परंतु त्याला अनंतकाळचे जीवन देण्यासाठी, जे अनंत म्हणजे सार्वकालिक जीवन असेल."

131 गरीब, आंधळे, कंगाल लोकहो, तुम्ही ते कसे चुकवता? "मोठी" कृत्ये काय आहेत ती आपल्याला दिसत नाहीत का? ही सर्वांत महान गोष्ट जी आजपर्यंत घडू शकली, ती म्हणजे लोकांना अनंतकाळचे जीवन देणे होय. अनंतकाळचे जीवन म्हणजे काय? जीवन जे तो जगला, ते जीवन जे त्याच्यात होते, ते इतरांना द्यावे. एक मनुष्य असे करू शकतो? देवाचा पुत्र तसे करू शकतो.

132 येशू म्हणाला, "ज्या कोणाच्या पापांची तूम्ही क्षमा करिता, त्यांची क्षमा झाली आहे; ज्या कोणाची पापं तुम्ही तशीच ठेवता, ती तशीच ठेवलेली आहेत."

133 आता येथेच जेथे कॅथोलिक चर्च आणि इतर बरेचजणानी त्यांची मोठी चूक केली. ते बाहेर जाऊन म्हणाले, "मी तुमच्या पापांची क्षमा करतो." ते असे नव्हते.

134 बायबलमध्ये, त्यांना पापांची क्षमा कशी मिळाली? पेन्टेकॉस्टच्या दिवशी, या प्रश्नाचे उत्तर पेत्राने दिले. ते म्हणाले, "तारणासाठी आम्ही काय करु? आम्हाला हे कसे मिळेल जे तुम्हा सर्वांना मिळाले आहे?" त्याने तो मार्ग घालून दिला आहे. त्याने त्यांना काय करावे हे सांगितलेले आहे.

135 तो म्हणाला, "तुमच्यातील प्रत्येकाने, देवाकडे, पश्चात्ताप करा, आणि येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घ्या." कशासाठी? आपल्या पापाची क्षमा मिळण्यासाठी. तेथे ती "मोठी" कृत्ये आहेत.

136 आज सकाळी तुमच्यात किती प्रचारक आहेत, किती लोक, तुम्ही चुंबकीय टेपवर माझे वचन ऐकत आहात, आज सकाळी कलवरीला जायला तयार आहात का? आणि तेथे आपल्यासाठी देवाने काय केले ते पहा. आणि आपल्या संप्रदायांना सोडून द्या, आणि शुभवर्तमानाचा प्रचार करा. हाल्लेलुया! ते आता तुमच्या वर आहे. आपण त्याचे काय करणार आहात?

137 "यरुशलेमापासून प्रारंभ करून संपूर्ण जगात, पश्चात्ताप आणि पापांची क्षमा त्याच्या नावाने, यांविषयी प्रचार झाला पाहिजे." हाल्लेलुया! महिमा होवो! तिकडे तुम्ही आहात.

138 तुमच्यासाठी कलवरी काय आहे? त्या दिवसाने तुमच्यासाठी काय केले? काय तुम्हाला तिने दैवीज्ञानाने भरले आहे? काय तिने तुम्हाला एक आखडलेले मनुष्य बनविले? किंवा काय तिने तुम्हाला विकले गेलेले ख्रिस्ती बनविले? हाल्लेलुया!

139 पापाचे, मोचन झाले! "यापेक्षा मोठी कृत्ये तुम्ही कराल." "तुम्ही" कोण आहात हे आपण पाहता, नाही का? "यापेक्षा महान कार्ये," म्हणजे येशू ख्रिस्ताच्या नावात, पापांची क्षमा.

140 परंतु पंथ आणि संप्रदाय वगैरेद्वारे, ह्यांनी आपल्याला एका स्थानावर बांधले आहे, आपण अद्याप जगाची सेवा करीत आहात. मला कोणताही पुरुष सांगा, कोणतीही स्त्री सांगा, कलवरीकडे येथे येऊ शकते आणि कोणीतरी मोठे होण्यासाठी प्रयत्न करेल कारण कोणीतरी काहीतरी बोलले आहे. मला सांगा काय आपण कलवरीच्या मुखाकडे, योग्य दिशेने, तिच्या खऱ्या प्रकाशात, पाहू शकतो. आपण आपला दिवस कलवरीवर कसा घालवू शकता, आणि गर्वाने भरलेले बाहेर येऊ शकता? आपण एखाद्या संस्थेसाठी कटपुतली असे कसे बाहेर येऊ शकता, आणि काही मानव-निर्मित सिद्धांताविषयी उपदेश कसे देऊ शकता? ते आपणाला देवाच्या वचनापुढे नम्र का करीत नाही? जर आपण कधी तेथे गेलो, तर आपण नम्र होऊन बाहेर याल. आपल्या टोपीला पिसं लावून, तुम्ही तुमच्या संस्थेत कोणीतरी मोठे कसे होऊ इच्छिता, जेव्हा देवाचा पुत्र येशू ख्रिस्ताने स्वत:ला नम्र केले शरीराला ठेचण्याकरिता, तोंडावर थुंकण्याकरिता, लज्जित आणि अपमानित होईपर्यंत? आणि त्यांनी त्याचे कपडे फाडले, आणि जगासमोर, त्याला वधस्तंभावर खिळले. "लज्जेलाही त्याने तुच्छ मानले." आपण कलवरीवर कसे जाऊ शकता आणि तो जे काही होता त्यापेक्षा वेगळे कसे येऊ शकतो, एक बदनामी, एक लाज?

"अरे," तुम्ही म्हणाल, "ते मला लाथ मारून बाहेर काढतील." त्यांना लाथ मारू द्या.

141 आपला दिवस कलवरीवर घालवा, देव त्याच्या मार्गाने तुम्हाला नेईल. मला त्याचा पुन्हा उल्लेख करू द्या. आपला दिवस कलवरीवर घालवा, देव त्याच्या मार्गाने तुम्हाला नेईल.

आपण प्रार्थना करू या.

142 प्रभु, हो परमेश्वरा, आता आम्हा सर्वांना कलवरीवर घेऊन जा. चला स्वतःपासून दूर जाऊया. प्रभु, आम्हापासून, मनुष्यांची भीती, इतर कोणी काय म्हणणार आहे याची भीती, दूर कर. का, संपूर्ण जग त्याच्यावर हसले, त्याची चेष्टा केली. पण तो मृत्यूपर्यंत,

आज्ञाधारक होता. अपमानासाठी, तो आज्ञाधारक होता. तो संघराज्य सरकारच्या अधीन होता, अगदी आज्ञाधारक होता.

143 आणि आपण समजलो की जेव्हा सैतानाने या पृथ्वीवर प्रहार केला, तेव्हा तो या पृथ्वीवर राज्य करणारा आणि अधिकारी बनला. आपल्या प्रभूसमोरही त्याने हीच साक्ष दिली, आणि तो म्हणाला, "ही राज्ये माझी आहेत. माझ्या इच्छेप्रमाणे मी त्यांच्याबरोबर करेन." आणि आम्हाला हे समजले आहे की, त्या दिवसापासून आजपर्यंत हे जग, शापाखाली आहे, ज्याने त्यास शाप दिला त्याच्याद्वारे चालविले जात आहे.

पण, देवा, हे देवा, आम्ही अशा राज्याची सेवा करतो जे शापीत नाही.

144 देव पित्या, हे किती आश्चर्यकारक आहे, की आपण आज या—या चित्रपटातील जगामध्ये काही महान गोष्टी केल्या आहेत. या महान चित्रपटाद्वारे, जसे *दहा आज्ञा*, आणि यासारखे चित्रपट आले, ह्यासाठी की पुरुष आणि स्त्रियांनी पाहावे, यामुळे एखाद्या चर्चच्या दरवाजावर अंधकार येऊ शकला नाही, परंतु ते काय आहे त्यांना पाहू द्या. देवाचा मार्ग हा जगाद्वारे, नाकारला गेला. कारण आपण यासारखे आहोत...आम्ही साम्यवादाखाली रशियामध्ये जाऊ.

145 आम्ही या जगात आहोत, परंतु आम्ही या जगाचे नाही. आपण कलवरीला गेलो आहोत. आपण देवाच्या राज्यासाठी, त्याच्यापैकी एक होण्यासाठी, स्वतःला वधस्तंभावर खिळले आहे. जग काय म्हणते हे महत्त्वाचे नाही, आपण परमेश्वराच्या तुच्छ लेखलेल्या काही लोकांसह मार्ग स्वीकारला आहे. आपण पुनरुत्थानाकडे जात आहोत, आणि आमचा विश्वास आहे की हे लवकरच होणार आहे, प्रभु, तोपर्यंत आपण त्या राज्यात उठविले जाणार आहोत जे हे जग ताब्यात घेईल. जसे दानिएलाने ते अगोदरच पाहिले, आणि त्याने सर्व जगाचे, फुटून लहान तुकडे तुकडे केले, आणि वाऱ्याने उन्हाळ खळ्यातील भुसाप्रमाणे ती उधळून नेली. परंतु, तो पर्वत, त्या पाषाणाचा एक मोठा पर्वत होऊन त्याने सर्व पृथ्वी व्यापिली. तो पाषाण येणार आहे. देवा, आम्हाला त्याचा एक भाग व्हायचे आहे. आपण स्वतःला नाकारू या, दररोज आपला वधस्तंभ वाहू या, ख्रिस्तासाठी जगूया, इतरांसाठी जगूया. प्रभु, हे प्रदान कर.

146 आज सकाळी येथे काही आहेत, आणि ते त्याला तारणारा म्हणून ओळखत नाहीत, आणि त्यांची इच्छा आहे की या शेवटच्या प्रार्थनेत त्यांची आठवण केली जावी, आणि त्यांना हा आपला दिवस कलवरीवर असलेला आवडेल, आपण आपले हात वर कराल, आणि म्हणाल की, "भाऊ ब्रॅन्हम, माझ्यासाठी प्रार्थना करा. मी त्याला माझा तारणारा म्हणून ओळखू इच्छित आहे." देव तुम्हाला आशीर्वाद देवो, तरुण मित्रा. कोणीतरी? तेथे मागे माझ्या बंधु, देव तुला आशीर्वाद देवो.

147 तेथे कोणी असेल का? म्हणा, "मी त्याला ओळखू इच्छितो. माझ्यासाठी, हा दिवस कलवरीवर असावा अशी माझी इच्छा आहे. मी आजारी आहे आणि थकलो आहे. मी अशा क्षुल्लक गोष्टींच्या सभोवती फिरण्याचा काय उपयोग जेव्हा त्या गोष्टी करण्यासाठीच माझ्या जन्म झाला आहे? माझा जन्म झाला, देवाचा पुत्र होण्यासाठी जन्मलो, आणि मी येथे जगाच्या गोष्टी धरुन आहे. देवा, आज मला वधस्तंभावर खिळू दे. आज मला, स्वतःला, आणि माझ्या कल्पनांना वधस्तंभावर खिळू द्या, जेणेकरून मी ख्रिस्ताबरोबर जिवंत राहावे, आणि इतरांसाठी जगावे. याची पर्वा नाही की ते माझे काय करतात, माझी चेष्टा करतात, आणि माझा छळ करतात, आणि माझ्याबद्दल वाईट गोष्टी बोलतात, आणि अशा गोष्टी, मला नम्रतेने चालू द्या, आणि लीनतेने, एका कोकऱ्या प्रमाणे, जसे त्याने केले. आणि एके दिवशी, शेवटच्या दिवशी, त्याने मला पुन्हा उठवण्याची प्रतिज्ञा केली आहे.

मी त्या दिवसाची वाट पाहत आहे.” काय तेथे आणखी काही हात वर करू शकतात? देव तुला तेथे मागे आशीर्वाद देवो, आणि तुम्हास. ठीक आहे. आणखी काही फक्त...देव तुम्हाला आशीर्वाद देईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल. आणखी काही, आम्ही प्रार्थना करण्यापूर्वी.

148 आमच्या स्वर्गीय पित्या, असे म्हटले होते, जेव्हा पेन्टेकॉस्टच्या दिवशी पेत्राने प्रचार केला, “जेवढयानी विश्‍वास ठेवला ते मंडळीमध्ये जोडले गेले.” त्यांनी मनापासून विश्‍वास ठेवला. हे लोक ज्यांनी नुकताच हात वर केला आहे, माझा विश्‍वास आहे की त्यांनी अगदी मनापासून विश्‍वास ठेवला आहे. आणि जर त्यांनी ठेवला आहे, तर तेथे पाण्याचा तलाव त्यांची वाट पाहत आहे. त्यांची इच्छा आहे की त्यांच्या पापांची क्षमा व्हावी. येथे कोणी आहे जे त्यांना त्या नावात बाप्तिस्मा देऊ शकतील, आणि स्वर्गाखाली मनुष्यामध्ये फक्त एकच नाव देण्यात आले आहे, जेणेकरून आपले तारण व्हावे.

149 कारण, मी काही क्षणांपूर्वी पवित्र शास्त्राचा उल्लेख केला आहे की, त्या, “यरुशलेमेपासून आरंभ करुन, सर्व जगात, त्याच्या नावाने पश्चात्ताप आणि पाप मोचन घोषित झाले पाहिजे.” आणि यरुशलेमेमध्ये, जेव्हा पश्चात्ताप आणि पापांची क्षमा याविषयी घोषणा केली गेली, तेव्हा प्रेषितांनी त्यांना त्या शास्त्रवचनाविषयी सांगितले. आणि ते म्हणाले की त्यांनी “प्रथम, पश्चात्ताप करावा, आणि मग येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घ्यावा.” हेच प्रचारकांचे काम होते. त्यांनी पश्चात्ताप करावा, आणि त्यांच्या पापांच्या क्षमेसाठी त्यांना बाप्तिस्मा द्यावा. “ज्या कोणाच्या पापांची तुम्ही क्षमा करिता, त्यांची क्षमा झाली आहे; ज्या कोणाची पापं तुम्ही तशीच ठेवता, ती तशीच ठेवलेली आहेत.”

150 पित्या, जगाची या क्रोधाच्या झटक्यापासून कशी सुटका होईल? या साध्या शुभवर्तमानाचा विश्वास का करू नये? आणि ते त्याऐवजी त्यासाठी पर्याय आणतात: खोटी नावे, खोटा बाप्तिस्म्या, खोट्या पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा, सेवकांशी हात मिळवणे, पिता, पुत्र, पवित्र आत्मा अशी शीर्षके वापरणे, जे पवित्र शास्त्रात कधीही सांगितले नाही; हे रोमी लोकांनी बनविलेले दस्तऐवज आहे, अशी बायबलमध्ये कोठेही ख्रिस्ती शिकवण नाही. पापांची क्षमा शीर्षकाद्वारे होऊ शकत नाही, परंतु येशू ख्रिस्ताच्या नावाद्वारे होऊ शकते.

151 आता, पित्या, हे आम्हाला माहित आहे की ते फार लोकप्रिय नाही. तुझे मार्ग नेहमीच तसे आहेत. परंतु आज सकाळी, पुरुष आणि स्त्रिया, त्या दिवसाकडे, कलवरीवरील त्या दिवसाकडे येऊ द्या. जेथे, त्या दिवशी येशूचा तिरस्कार केला गेला, ती लज्ज्ञा, फटके खाणे, व छिन्नवीछिन्न केले जावे, त्याच्यावर थुंकणे, आणि चेष्टा करणे; संपूर्ण जगाद्वारे, चर्चद्वारे, ज्यांनी त्याच्यावर प्रीति केली पाहिजे अशा लोकांकडून. आणि, तरीही, या सर्व गोष्टींमध्ये, त्याने आपले मुख उघडले नाही, आणि जे लोक त्याची थट्टा करीत होते त्यांच्याकरिता तो गेला आणि मरण पावला.

152 देवा, आज सकाळी आम्हाला कलवरीवर घेऊन जा. आणि जर ते म्हणतात की आम्ही वेडे आहोत, ते म्हणतात की आमच्याकडे चुकीचे पवित्र शास्त्र आहे, जे काही त्यांना म्हणायचे आहे, देवा, ते देवाच्या उपस्थितीत उभे राहू शकत नाही आणि ते चुकीचे आहे असे म्हणू शकत नाहीत.

ते बायबलद्वारे त्यांची पापे झाकू शकत नाहीत. बायबल त्यांची पापे, त्यांचा अविश्वास, उघड करते: यासाठी की लोकप्रिय व्हावे; बाकीच्या लोकांप्रमाणे करावे. आज सकाळी त्यांना कलवरीकडे येऊ द्या.

153 “आणि यरुशलेमे पासून सुरुवात कर; यरुशलेमे पासून आरंभ करून, सर्व राष्ट्रांमध्ये, त्याच्या नावाने पश्चात्ताप व पापक्षमा यांची घोषणा झाली पाहिजे.”

त्यांना वधस्तंभावर जाण्यासाठी पाऊल उचलू दे, त्यांना छिन्नवीछिन्न करण्यासाठी; आणि थुंकणे आणि चेष्टा करणे यासाठी; आणि त्या सर्व गोष्टी बोलू द्या ज्याला धार्मिक विश्वासघातकी म्हटले जाऊ शकते; मंडळ्या तोडणारे; हे सर्व त्यांना बोलू द्या.

प्रभू, आम्हास, आज सकाळी, परमेश्वराच्या तुच्छ लेखलेल्या काही लोकांसह आमचा मार्ग पकडू दे. आम्हाला उजवीकडे किंवा डावीकडे न वळता, प्रेषितांप्रमाणेच चालू दे, आणि आमच्या अंत:करणाच्या चांगुलपणाने देवाची सेवा करू दे. पित्या, हे प्रदान कर.

154 आता, प्रार्थना रांगेत येणाऱ्या आजारी आणि पीडित व्यक्तींना बरे कर. ज्यांनी त्यांचे हात वर केले आहेत, ते त्यांच्या अंत:करणात, आताच, पश्चात्ताप करोत. जे लोक इतक्या समयापासून मागे उभे आहेत, ते त्वरीत पाण्याकडे जावोत आणि त्यांच्या पापांची क्षमा पावोत देवाचा पुत्र, येशू ख्रिस्त, याच्या बलिदानाच्या नावाने. आमेन.

त्या वधस्तंभावर जेथे माझा तारणारा मरण पावला,
मी तेथे पापांपासून शुद्ध होण्यासाठी रडलो;
तेथे माझ्या अंत:करणाला रक्त लावले गेले;
त्याचे गौरव…

त्याच्या नावाचा गौरव असो!
होय, त्याच्या नावाचा गौरव असो!
होय, तेथे माझ्या अंत:करणाला रक्त लागू केले गेले;
त्याच्या नावाचा गौरव असो!

मी खूप चमत्कारीकरित्या पापांपासून तारलो गेलो, (कसे?)
येशू इतक्या मधुरतेने आत राहतो,
वधस्तंभावर जेथे तो…(त्याच्यातील एक व्हा.) मध्ये;
अरे, त्याच्या नावाचा गौरव असो!

त्याच्या नावाचा गौरव असो!
त्याच्या नावाचा गौरव असो! (मौल्यवान नाव.)
अरे, तेथे…अंत:करणावर रक्त लागू झाले;
त्याचे गौरव…

155 ते आपल्यासाठी काही करत नाही का? आपल्याला शुद्ध करते. आपल्यामध्ये एक आशा ठेवते: जीवनाची, सार्वकालिक जीवनाची.

156 "ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळणे" म्हणजे काय? इतरांसाठी जगणे आहे. कोणत्या प्रकारचे इतर? जे तुमचा द्वेष करतात, जे तुम्हाला आवडत नाहीत, जे तुमची चेष्टा करतात: त्यांच्यासाठी जगा; त्यांच्याबरोबर रहा; त्यांच्यावर प्रेम करा; "त्यांच्यासाठी प्रार्थना करा जे तुमचा तुच्छतेने वापर करतात, माझ्या नावामुळे तुमच्याविषयी सर्व प्रकारचे लबाड भाषण करतात. त्यांनी तुमच्या आधी असलेल्या संदेष्ट्यांचा छळ केला."

157 मला वाटले की आज सकाळी हा संदेश कदाचित मंडळीचे सहाय्य करील, की तुम्हाला कळेल की आपल्याला कलवरीची गरज आहे, आपल्याला वधस्तंभाची आवश्यकता आहे.

158 आता त्याने हे सर्व काय केले? त्या सर्वांची भरपाई केली आहे. व्हीलचेयरवर असलेली बहीण, येथे आजारी व पीडित असलेल्या लोकांना: या सर्वांसाठी किंमत दिलेली आहे; आपल्याला फक्त एकच गोष्ट करायची आहे ती म्हणजे आपल्याला विश्वास

ठेवला पाहिजे की ती माझी आहे; तशाच प्रकारे तिचा स्वीकार केला पाहिजे, आणि आपण बरे व्हाल.

159 लक्षात ठेवा: आता ते काय आहे? आपण जगात जाऊ शकता, सुवार्तेचा प्रचार करू शकता, आजारी लोकांना बरे करू शकता; आणि अनंतकाळचे जीवन प्रदान करु शकता.

हे त्याहून किती मोठे असेलः येथे, एक माणूस येथे ट्यूमर सह—सह, कर्करोगाने, जे काही आहे, पिडीत आहे. (आम्ही त्याला पुष्कळ वेळा आशीर्वाद देताना आणि पुरुषाला व स्त्रीला बरे करताना, पाहिलेले आहे; जगभरातील हजारोच्या हजारो वेळा अचूक प्रकरणे, त्यांना खाटेतून, स्ट्रेचर्समधून; बाहेर काढताना पाहिले आहे; केवळ लोकांची सावली कर्करोगाला नष्ट करते; आज, ते बरे, निरोगी लोक आहेत.) "जी कृत्ये मी करितो ती तुम्हीसुद्धा कराल, परंतु यापेक्षा मोठी तुम्ही कराल": "यापेक्षा अधिक," बरोबर आहे.

काय? मी येशूच्या नावाने त्यांना जीवनाची मुदत वाढवून दिली आहे, त्यांचे आयुष्य थोड्या दिवसांसाठी वाढविले आहे.

परंतु, "यापेक्षा तुम्ही अधिक करालः माझ्या नावाने तुम्ही त्यांना शाश्वत जीवन द्याल." व्वा!

160 आपण त्या मौल्यवान नावाची लाज का बाळगता? लोक ते का दूर करतील आणि त्यापासून दूर जातील? हे पिशाच आहे. नक्कीच.

161 "यरूशलेमपासून आरंभ करुन, सर्व जगात पश्चात्ताप आणि पापक्षमा यांची घोषणा त्याच्या नावाने झाली पाहिजे." तेथेच सर्वप्रथम संदेश गेला. ते बरोबर आहे का? "यरुशलेमेपासून आरंभ करुन पश्चात्ताप आणि पापांची क्षमा यांची घोषणा त्याच्या नावाने झाली पाहिजे."

162 आता, प्रथम, आपण त्याने केले तसे करू: आजारी लोकांना बरे करण्याची प्रार्थना करु.

163 नंतर, आपल्याकडे एक महान भेट आहे: बाप्तिस्मा घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी, येथे मागे, हे पाणी तयार आहे (येथे स्त्रियांसाठी कपडे आहेत, पुरुषांसाठी येथे वस्त्रे आहेत), तुमच्या पापांची क्षमा मिळण्यासाठी तुम्ही सज्ज व्हा; कारण लक्षात ठेवा, आपण आपल्या पापांची क्षमा केवळ बायबलच्या शिकवणीनुसारच मिळवू शकता. "कारण जेणेकरून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यामध्ये दिलेले नाही."

164 पौल काहींना भेटला ज्यांचा बाप्तिस्मा अगोदरच झालेला होता. आणि ते विजय मिळाल्याबद्दल, ओरडत होते. तो म्हणाला, "तर तुम्ही कसला बाप्तिस्मा घेतला?".

ते म्हणाले, "योहानाचा."

त्याने म्हटले, "योहान पश्चात्तापाचा बाप्तिस्मा देत असे." आता, हे समजून घ्या: तो पश्चात्तापाचा होता, पाप मोचणासाठी नव्हता. किती जणांना हे समजते? पापमोचण मिळण्यासाठी नाही. त्यांना पश्चात्ताप करण्यासाठी, बाप्तिस्मा देण्यात आला, ठीक आहे. त्यांनी पश्चात्ताप केला: "होय, गुरुजी, मी पश्चात्ताप केला आहे. तो येत आहे यावर मी विश्वास ठेवतो." त्यांना *पश्चात्ताप करण्यासाठी* बाप्तिस्मा देण्यात आला; म्हणजे, "प्रभु येशू ख्रिस्तावर विश्‍वास ठेवण्याद्वारे."

165 नंतर जेव्हा त्यांनी हे ऐकले (की अर्पण आधीच आले आहे), त्यांना येशू ख्रिस्ताच्या नावात, पुन्हा बाप्तिस्मा देण्यात आला. आणि मग, जेव्हा त्याने त्यांच्यावर आपले हात

ठेवले, तेव्हा त्यांच्यावर पवित्र आत्मा आला; आणि ते निरनिराळ्या भाषा बोलू लागले व ईश्वरी संदेश देऊ लागले.

166 आता, तुम्ही तो शास्त्रलेख कसा बदलणार? तुम्ही बायबलमध्ये एका ठिकाणी आपले बोट ठेवा जेथे नवीन करारात, कोणासही आजपर्यंत त्यांच्या पापांची क्षमा मिळाली आहे, आणि येशू ख्रिस्ताच्या नावाखेरीज इतर कोणत्याही प्रकारे कोणाचा बाप्तिस्मा झाला आहे.

167 मला बायबलमध्ये एकतरी जागा दाखवा जेथे पिता, पुत्र, पवित्र आत्म्याच्या नावात कोणत्याही व्यक्तीचा बाप्तिस्मा करण्यात आला. किंवा माझ्यापुढे इतिहास आणा, मंडळीचा इतिहास जो दाखवतो की कोठे कोणाचाही बाप्तिस्मा पिता, पुत्र, आणि पवित्र आत्म्याच्या नावाने झाला होता, शेवटच्या प्रेषिताच्या मृत्यूनंतर तीनशे–आणि–काही वर्षांपर्यंत, जेव्हा कॅथोलिक चर्च संघटित केले गेले होते.

168 आता, माझ्या अभ्यासात *पूर्व–नीसीया पूर्वज*, आणि...सर्व इतिहासकार, आणि सर्व काही, आहेत: जगातील सर्वात प्राचीन, पवित्र इतिहास; केवळ आमच्याकडेच अचूक पुरावे आहेत.

169 *अवर संडे विजिटर* वाचा, किंवा कॅथोलिक चर्चचा कॅटेकिझम वाचा, आणि त्यांचे निरीक्षण करा, त्यांचे काय म्हणणे आहे: "काही प्रोटेस्टंट लोक कदाचित वाचले जातील, कारण ते कॅथोलिक मतापुढे झुकतात: कारण त्यांचे बायबल म्हणते, 'येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा घ्या,' परंतु आम्ही 'येशूच्या नावाचे' गांभीर्य काढून घेतले आहे, आणि तेथे 'पिता, पुत्र, पवित्र आत्मा,' वर लावले आहे, आणि त्यांनी ते कबूल केले."

आता, मला त्या विरुद्ध एक शास्त्रलेख दाखवा.

170 आणि आपण तेथे आहात. आणि तरीही, जग त्यापुढे झुकत आहे. का? ते कधीच कलवरीवर गेले नाही. बस एवढेच. त्यांनी कधीही पाहिले नाही.

171 ते तुमची चेष्टा करतील आणि तुम्हाला नावे ठेवतील...ते आपणास, "देवविषयक वेडे" देखील म्हणतील, "जिजस ओनली," आणि त्यांना शक्य असलेली सर्व कडवट नावे देतील. ते आपल्याला काय नावे ठेवतात याने काय फरक पडतो? त्यांनी काय केले...त्याला जाणीव आहे की ते त्याला काय म्हणतात? त्याला वधस्तंभावर खिळण्यात आले. तो देवासाठी जगला, आणि फक्त देवासाठीच जगला. आणि जर तोच आत्मा, जो त्याच्यामध्ये होता, तुमच्यामध्ये आहे, तर त्याचे नाव धारण करून, तुम्हालाही तेच: करण्यास प्रवृत्त करील. "तुम्ही जे काही करता" (बायबल म्हणते) "शब्दात किंवा कृतीतून, सर्व काही येशूच्या नावाने करा, आणि देवाची स्तुती करा."

172 तुम्हाला ती त्रैक्य, मूर्तिपूजक शिकवण कोठुन मिळाली? कॅटेकिझममधून, बायबलमधून नाही. उत्पत्ती ते प्रकटीकरण या संपूर्ण शास्त्रवचनांमध्ये "त्रैक्य" या शब्दाचा उल्लेख नाही. अशी कोणतीही गोष्ट नाही. त्रैक्य देव अशी कोणतीही गोष्ट नाही. तो देव आहे, फक्त देव आहे, एकच देव. सदैव एकच देव आहे. त्याने तीन कार्यालयांतून सेवा केली: मोशेच्या काळात, त्याने एकदा पिता म्हणून सेवा केली. त्याने देहात एकदा, पुत्र, येशू म्हणून, सेवा केली. तो आता पवित्र आत्मा म्हणून सेवा करतो. पण तो एक देव आहे. एक देव, तीन नावांसह नाही. तीन कार्यालये, एका नावात तीन शीर्षके: येशू ख्रिस्त.

173 काहीही निराळे ही मूर्तिपूजा आहे; आणि मी कोणालाही ते दर्शविण्यासाठी सांगतो, जर ते तसे नाही. ते बरोबर आहे. मी तसे वर्षानुवर्षे वर्षानुवर्षे म्हटले आहे, आणि आजपर्यंत, कोणीही ते घेतले नाही, (पहा?), कारण तसे होऊ शकत नाही. माझ्याकडे...

प्रथम, येथे बायबल आहे; आणि प्राचीन इतिहास आहे हे सिद्ध करण्यासाठी की ते अगदी बरोबर आहे. आणि का सैतान केवळ...? मी...बरं, बायबल म्हणतं की ते तसेच असतील: “मी त्यांना आकर्षित केल्याशिवाय, ते कसे येऊ शकतात?” मला फक्त हे माहित आहे. हेच येशू म्हणाला, म्हणून...

174 मी असे म्हणत नाही की ते असावे...जर मी तसे म्हटल्यास, आणि यासारखे प्रवचन प्रचार केल्यास, मी तुमच्यातील सर्वात कमी दर्जाचा ढोंगी असेन. ते बरोबर आहे. मी तसे म्हणतो कारण ते सत्य आहे आणि तेच जीवन आहे. जितक्यांनी ख्रिस्तामध्ये बाप्तिस्मा घेतला आहे, त्यांनी ख्रिस्ताला पांघरले आहे. त्यांच्याकडे जीवन, त्याच्या नावाने आहे.

175 आपण त्याच्या नावाने प्रार्थना करतो, त्याच्या नावाने शोध घेतो, त्याच्या नावाने प्रचार करतो, त्याच्या नावात बाप्तिस्मा करतो, त्याच्या नावाने जगतो, त्याच्या नावाने मरतो, त्याच्या नावाने स्वर्गात जातो, त्याच्या नावाने पुनरुत्थित होतो. “स्वर्गातील सर्व कुटुंबांना येशूचे नाव दिले आहे.” बायबलमध्ये असे म्हटले आहे: “पृथ्वीवरील सर्व कुटुंबांना येशूचे नाव दिले आहे.” तो म्हणाला, “मी माझ्या आलो...”

आपण म्हणता, “ठीक आहे, ते पित्याचे नाव आहे.”

*पिता* हे नाव नाही, ते शीर्षक आहे. तो म्हणाला, “मी माझ्या पित्याच्या नावाने आलो आणि तुम्ही माझा स्वीकार केला नाही.” आता, तो कोणाच्या नावाने आला? ओह–हं. नक्कीच, “...आणि तुम्ही माझा स्वीकार केला नाही.”

176 तर तुम्ही तेथे आहात; ते फक्त, होय, ते ज्ञानी आणि विचारवंत ह्यांच्या दृष्टीपासून गुप्त ठेवले आहे. नक्कीच, हे निश्चितपणे आहे, उह–हु.

177 आणि प्रकटीकरणामध्ये, आम्ही त्या दिवशी शिकविल्याप्रमाणे: आणि जुनी वेश्या मंडळी आहे, जी पहिली संस्था आहे; आणि मग तिला मुलींचा एक समूह मिळाला आहे जो तिच्यापासून जन्माला आला. त्या त्याच गोष्टी करतात, तीच सवय. ती सर्व रोमच्या चर्चसह...बाबेलमध्ये, त्याच मार्गाने, वाहते; आणि एक मंडळ्याचा, राष्ट्रांचा—चा संघ; ती तेथे आहे, सर्व वळण घेणारी, सर्व एकाच गोष्टीत, एकाच बोटीत.

178 परंतु देवाची मंडळी (हालेलुयाह!), ही एक बाहेर बोलवलेली, वेगळी केलेली मंडळी आहे. मंडळी कशी बांधली आहे? हे तुला कसे कळेल? हे सत्य असल्याचे आपणाला कधी कळू शकते? जेव्हा देव तुम्हाला ते प्रकट करतो. सफरचंदा ऐवजी ते कोकरू होते हे हाबेलाला कसे—कसे कळले? हे त्याला प्रकट करण्यात आले: “विश्वासाने हाबेलाने देवाला अधिक उत्कृष्ट यज्ञ अर्पण केला.”

179 रूपांतराच्या डोंगरावरून खाली येताना, येशू म्हणतो, “मी कोण आहे असे लोक म्हणतात?”

काही म्हणाले, “एलीया,” “मोशे” आणि इत्यादी.

तो म्हणाला, “पण मी तुम्हाला विचारत आहे, ‘तुम्ही मला कोण म्हणून म्हणता?’”

पेत्र म्हणाला, “तू ख्रिस्त आहेस, जिवंत देवाचा पुत्र आहेस.”

180 तो म्हणाला, “तुला हे कधीच कळले नाही...” अन्यथा (मी असे म्हणत आहे की, मोठे होण्यासाठी नाही, परंतु तो मुद्दा समजून घेण्यासाठी): “तु हे कधी एखाद्या सेमिनरीमध्ये शिकला नाहीत; कुणी मनुष्याने तुला हे कधी शिकवले नाही; परंतु माझ्या स्वर्गातील पित्याने, हे तुला प्रकट केले आहे: तो **मी आहे** (पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा नाही, परंतु, मी येशू ख्रिस्त आहे). आणि या खडकावर (कोणता खडक? तोच खडक; ज्यावर हाबेल गेला.), या खडकावर, देवाचे आध्यात्मिक प्रकट झालेले सत्य, मी माझी

मंडळी बांधीन, आणि अधोलोकाच्या द्वारांचे तिच्यापुढे काहीच चालणार नाही.” ते बरोबर आहे. ते प्रयत्न करतात, परंतु त्यांचे काहीच चालणार नाही. पहा?

181 म्हणून केवळ कलवरीवर जा, वधस्तंभी जा, परत या, आणि परमेश्वराच्या तुच्छ मानलेल्या काही लोकांसह आपला मार्ग घ्या, पुढे जा.

182 आता, प्रभु, आम्ही सर्व काही तुला देत आहोत. मला माहित नाही, या समुहातून, येथे किती आत आहेत. प्रभू, माझ्यामध्ये समजून घेण्याची युक्ति नाही, जोवर तू ते प्रकट करीत नाहीस. आणि आता, देव पित्या, मी तुला तसे करण्यास सांगत नाही. मी ते फक्त लोकांच्या जवळ ठेवले आहे. ते तेथे आहेत. आज सकाळी ही वास्तविक कलवरी असू दे; स्वत:ची इच्छा, आणि स्वत:ची वासना, आणि जीवनातील मोठ्या गोष्टींसाठी हे खरोखर वधस्तंभावर खिळले जाणे असू दे.

183 पुरुष नम्र होऊ दे, आणि परमेश्वराच्या तुच्छ मानलेल्या काही लोकांसह मार्ग स्वीकारण्यास तयार होऊ दे. ते नम्रपणे चालू दे. त्यांचा जन्म देवाच्या महान राज्यात, या राज्यामध्ये होऊ दे, जे आध्यात्मिक शरीर आहे, पृथ्वीवरील ख्रिस्ताचे गौरवी शरीर: “एका आत्म्याने आपण सर्वांनी एकाच शरीरात बाप्तिस्मा घेतला.”

184 प्रभु, हे प्रदान कर. ते काळे, पांढरे, पिवळे, तपकिरी, ते काहीही असो, पुरुष किंवा स्त्री, गुलाम किंवा स्वतंत्र: आपणा सर्वांना समान आत्म्याचा प्याला पिण्यासाठी बनविले गेले आहे.

185 पित्या, ते प्रदान कर, आणि आज सकाळी बऱ्याच लोकांमध्ये, ते असो…की हे त्यांना समजेल; तू त्यांची समज उघड. नंतर, त्यांच्यासाठी हा एक नवीन दिवस असेल: सूर्य प्रकाशेल, आणि मानवनिर्मित देवज्ञानाचा निराशाजनक प्रकाश निघून जाईल, आणि देवाचा प्रकाश त्यांच्या मार्गावर प्रकाशेल, आणि तो पडदा फाटला जाईल जो या सुंदर प्रकाशाला झाकीत आहे. आणि ते पवित्रतेच्या राजमार्गावर चालू शकतील, तेव्हा, ते दुसऱ्यांसाठी जगतील, जसे ख्रिस्ताने केले.

186 आता आपण प्रार्थनेची रांग आत आणत आहोत, मी प्रार्थना करतो की तू आज सकाळी, आपल्या सेवकांना, आम्हा सर्वांना, अभिषेक कर, जेव्हा आम्ही एक दुसऱ्यासाठी प्रार्थना करीत आहोत. आणि आज, प्रदान कर, की या प्रार्थना रांगेतून येणारा प्रत्येक आजारी व्यक्ति बरा होईल. लहान–तिरके डोळे असलेली मुलगी, आणि तो लहान मुलगा, आणि…आणि त्या वयस्कर बाईप्रमाणे, ते परत येवोत, आणि—आणि बंधू राइट, आणि प्रभू, त्यांच्यातील बरेच जे आले आहेत, दु:ख, रोग आणि डॉक्टरांना बरे न करता येण्यासारख्या अशा स्थितीतून आले आहेत; आणि येथे आज ते आहेत (एक आठवड्या अगोदर), आणि आज ते, पूर्ण, बरे आहेत.

187 देवा, पुरुष आणि स्त्रिया त्याच विश्वासाने पुढे जावोत, त्यांना माहित आहे की ते कलवरीला जाणार आहेत त्यांच्या विचारांना आणि त्यांच्या कल्पनांना वधस्तंभावर खिळण्यासाठी की त्यांचा “भूतकाळ बरा” झाला आहे. ज्या सामर्थ्याने येशूला कबरेमधून उठविले त्याद्वारे त्यांना जीवन, विश्वासाचे महान जीवन मिळो.

188 आणि त्यानंतर, लगेचच, अनेकजण बाप्तिस्मा घेण्यासाठी तलावा जवळ येवोत. आम्ही येशूच्या नावाने मागतो. आमेन.

189 आता, आपल्याकडे प्रार्थना रांग आणि बाप्तिस्म्यासंबंधी सेवा चालविण्यासाठी वीस मिनिटे आहेत. आता आपल्याकडे प्रार्थना पत्रके नाहीत. आपण त्यातून मिळवले आहे, आणि आपण जेव्हा माझ्या मोठ्या सभांची सुरुवात करु तेव्हा आपण हे कार्य करण्याचा

प्रयत्न करू. मी आपणा सर्वांना सांगितले आहे, आम्ही ते घालून दिले आहे, आमच्याकडे ते टेपवर आहे, आणि जेथे मी जातो तेथे त्या टेप पुढे पाठविल्या जातील.

190 चिन्ह केवळ आशीर्वादाला दर्शवितात. विचार असा होता, “जर तू आजारी व्यक्तीसाठी प्रार्थना करशील, लोकांना तुझ्यावर विश्वास ठेवायला लावशील.”

मी म्हणालो, “ते माझ्यावर विश्वास ठेवणार नाहीत.”

तो म्हणाला, “तुला ही चिन्हे दिली जातील, आणि यावरुन ते विश्वास ठेवतील.” दहा वर्षांपासून, एकही वेळेस न चुकता, ही चिन्हे जगभरात पसरली आहेत. त्यात बिलकुल, अपयश आले नाही. किती लोकांना ते सत्य आहे हे माहित आहे?

191 ठीक, जर आपण चिन्हावर विश्वास ठेवू शकत असाल, तर संदेशावर विश्वास ठेवा. ते बरोबर आहे. ते हे दाखवते. आणि देव माझ्यामध्ये संदेश देईल (आणि ते इतके परिपूर्ण होऊ दे, परंतु काय...) आणि मी तुला काहीतरी सांगतो जे खोटे आहे? देव मला तसे करू देणार नाही. नाही, नाही. नाही श्रीमान. मी तुम्हाला सत्य सांगत आहे.

192 आता, आपण, येथे या रांगेमधील, जे प्रार्थना करून घेऊ इच्छिता, या बाजूने या, जर आपण, तेथे असाल तर, उजवीकडे रांग लावा. आणि मग आम्ही प्रार्थना करीत असता ते लोकांना त्यातून येण्यास मदत करील. मग आम्ही त्या—त्या मुलांकडे जाऊ, व्यवस्था पाहणारे आणि ते त्यांच्यावर लक्ष ठेवतील; आणि ते इथून पुढे येताना, मग या बाजूस, आम्ही त्यांना मागे परत आणू, आणि त्यांना त्यातून आणू. प्रत्येकासाठी प्रार्थना केली पाहिजे.

193 [कोणीतरी भाऊ ब्रॅन्हमशी बोलते—सम्पा.] अरे, नाही, मी असे केले नाही. बरं, तुला पाहिजे तेव्हा कधीही. हरकत नाही. आपण तिला बाहेर आणू शकता किंवा आपण... मी करू शकतो...तिला आत्ताच तेथे आणू शकता, किंवा थोड्या वेळाने, कधीही जेव्हा तिची इच्छा असेल, काही हरकत नाही.

194 आता, पुढील काही मिनिटांसाठी, आपण शक्य तितके शांत होऊ या. तुम्ही सर्वांनी आता विचार करावा अशी माझी इच्छा आहे: आता, काय म्हणते—बायबल काय म्हणते? “विश्वासाची प्रार्थना आजाऱ्याला वाचवील.” किती लोकांना माहित आहे की ते बरोबर आहे? किती लोकांना ठाऊक आहे बायबल असे म्हणते, “ही चिन्हे विश्वास ठेवणाऱ्यांबरोबर असतील. जी कृत्ये मी करितो ती तुम्हीसुद्धा कराल”? आणि ती कृत्ये काय होती? तो म्हणाला, “मी करू शकतो जर तुमचा विश्वास असेल की मी हे करण्यास समर्थ आहे.” ते बरोबर आहे का?

माझा प्रश्न काय होता? “ते माझ्यावर विश्वास ठेवणार नाहीत.”

तो म्हणाला, “ह्या चिन्हामुळे ते विश्वास ठेवतील.”

195 आता, जर तुमचा विश्वास असेल, तर तयार व्हा: हा तुमचा मुक्तीचा समय आहे. हे तसेच आहे जशी ती पापापासून होते, ते त्याच देवाचे तेच अभिवचन आहे.

196 आता, आमच्याकडे येथे एक लहान, आजारी स्त्री आहे, जिला पोटाचा त्रास झाला आहे, ती न्यू अल्बानी येथली आहे. आम्ही प्रथम, तिच्यासाठी प्रार्थना करणार आहोत, जेणेकरुन तिला तिची—तिची जागा मिळू शकेल. आता, शांतपणे, आणि प्रत्येकजण, आता. येथे, बंधूंनी मला मदत करावी अशी माझी इच्छा आहे. आणि आता, प्रार्थनेसाठी, आपण काही क्षण आपली मस्तके झुकवूया.

197 आता, स्वर्गीय पिता, हे तुझे वचन आहे. त्यावरील प्रतिक्रियेसाठी मी जबाबदार नाही, परंतु त्याचा प्रचार करण्यासाठी मी जबाबदार आहे. आणि हे जाणून (आणि मी आत्ताच

एक मध्यमवयीन मनुष्य आहे हे जाणून, आणि एक दिवस तुला सामोरे जावे लागेल): मी मनापासून सत्याचा प्रचार केला आहे. तुला ते माहित आहे. पूर्वग्रह असू नये, जर तसे असेल, तर प्रभु, मला पश्चात्ताप हवा आहे.

198 आणि पित्या, मी प्रार्थना करतो की तू मदत कर, आता, जेव्हा आम्ही आजारी लोकांसाठी प्रार्थना करण्यास जात आहोत, माझ्या प्रार्थनांचे उत्तर दिले जावे, प्रभु, फक्त माझ्याच प्रार्थना नव्हे, तर या मंडळीची प्रार्थना, कारण ही गरीब लोक…काय असेल जर ही माझी बायको इथे उभी असती? जर ती व्हीलचेयरवर बसून असती तर? किंवा माझी बहीण? माझी आई? हे देवा, या लोकांना बरे कर. प्रभु, तू करशील?

199 पहा, प्रार्थना ओळीत उभे रहा: हृदय रोग, कर्करोग, ट्यूमर, सर्व प्रकारचे रोग आणि पीडा. त्यांच्यातील बरेच लोक येत आहेत (प्रभू, शेकडो लोक येथून मुक्त, होत आहेत,) आणि त्यांनी ते पाहिले, आणि त्यांनी विश्वास ठेवला, आणि ते त्यांचे स्वीकारण्यासाठी प्रार्थना रांगेत येत आहेत. ते आता जिवंत खडकाकडे येत आहेत, तुझ्या सेवकाकडे नाही, परंतु तुझा पुत्र, येशूकडे, जो मंडळीचा नेता आहे, आपल्यामध्ये आध्यात्मिक, गूढ व्यक्ती आहे. आणि आम्ही जात असताना, त्याचे नाव देत आहोत (तु म्हणालास की, "माझ्या नावाने ते भुते काढतील."), मी प्रार्थना करतो की तू येशूच्या नावाने आमच्या प्रार्थनेचे उत्तर दे. आमेन.

200 आता, प्रत्येकजण प्रार्थना करीत रहा. आता, हा तुमचा देखील एक भाग आहे. ही तुमची प्रार्थना आहे.

जर कोणी तिला मदत करत नसेल, तर ही लहान स्त्री मरण पावेल.

201 भाऊ स्टडस्क्लेव्हला किती जण ओळखतात? भाऊ आणि बहीण स्टडस्क्लेव्ह? त्या रात्री मला जर्मनीहून तीन वेळा बोलावण्यात आले; त्यांचे बाळ मेले होते. त्यांनी विचारले, "भाऊ ब्रॅन्हम, आम्ही तुम्हाला देवाच्या आत्म्याने, मृतांना उठविताना पाहिले आहे." (ते उपस्थित होते आणि त्यांनी ते पाहिले. पहा?) "आणि आम्ही जाणतो की आपण परमेश्वराचे संदेष्टा आहात. फक्त शब्द बोला."

मी म्हणालो, "ते माझ्या मुखात घातल्याशिवाय, मी ते बोलू शकत नाही."

"जर्मनीला या." मी लगेच उठलो. आणि त्यांनी फोन केला: "जेट विमान आहे जे तुम्हाला सहा तासांत जर्मनीला घेऊन येईल." एक लष्करी जेट विमान मला मृत मुलाला उठवण्यासाठी जर्मनीला घेऊन जाईल. एक लष्करी विमान मला लुईसविलेपासून, जर्मनीच्या, मोंचेनपर्यंत सहा तासात नेईल.

202 मी तेथे गेलो, आणि माझ्या गुडघ्यावर गेलो, व मी म्हणालो, "पित्या, मी काय बोलले पाहिजे? माझ्या मुखात शब्द घाल." त्याने मला उत्तर दिले नाही. मी जंगलात गेलो, मी म्हणालो, "पित्या, मी काय बोलले पाहिजे? माझ्या मुखात शब्द घाल. नाही तर, माझे जाणे व्यर्थ होईल." मी परत गेलो, त्याने मला उत्तर दिले नाही. आत आलो. रात्रभर मी प्रार्थना केली, "प्रभू, शब्द माझ्या मुखात घाल." काहीही उत्तर दिले नाही.

203 दुसऱ्या दिवशी सकाळी माझी पत्नी उठली. ती निघून जाताच, तो शब्द (मी उभा राहिलो), तो म्हणाला, "याचा निषेध करू नको. हा परमेश्वराचा हात आहे." ओह–हं.

नंतर लगेच फोनवर: "मी येऊ शकत नाही. नाही, हा परमेश्वराचा हात आहे. मला निषिद्ध केले आहे." त्या निषेधात कोणती शक्ती आहे ते तुम्ही पाहा? जेव्हा देव म्हणाला, "तुम्ही तसे करु नका, कारण तो परमेश्वराचा हात आहे."

204 आता, एकदा, मोशेला असे करण्यास सांगण्यात आले की काहीगोष्ट करू नको, गेला आणि तरीही ती केली. तुम्हाला आठवतेय? म्हणून मी—मी गेलो नाही.

205 आणि मी डॉक्टरांद्वारे मृत घोषित केलेल्या, चार वेगवेगळ्या लोकांचे निवेदन आणू शकतो, प्रार्थनेनंतर आणि मृत्यूच्या निषेधानंतर. पहा? आपण तेथे त्या गोष्टीचा निषेध करण्यासाठी उभे आहोत. आणि जर देवाने आपल्याला काहीतरी करण्याची शक्ती दिली आहे तर आपण काय करीत आहात याबाबत सावध असा. पहा? हे चांगले आहे की आपण सावध–...तो म्हणाला, “करू नका...”

206 आता, लक्षात ठेवा, हे कदाचित आपल्यासाठी इतकी मोठी गोष्ट असणार नाही, परंतु माझ्यासाठी, ती महत्वाची गोष्ट आहे. पहा?

“हयाचा निषेध करू नको.” खरा गोड, दयाळू आवाज (सुमारे साढे–सहा, माझा असा विश्वास आहे, की ते सकाळचे साढे–सहा होते) म्हणाला, “हयाचा निषेध करू नकोस. हा परमेश्वराचा हात आहे.”

मी म्हणालो, “पित्या, धन्यवाद. धन्यवाद, देवा. मी हे करणार नाही.”

207 जर तो म्हणाला असता, “ह्याचा निषेध कर. हा शत्रू आत आला आहे.”

मी म्हणाला असतो, “चला जाऊ या.” आणि ते केले गेले असते.

208 जेव्हा फिनलँडमध्ये तो लहान मुलगा तेथे मृतावस्थेत, चिरडला गेलेला, पडलेला होता, त्याच्या शरीरात एकही हाड साबूत नव्हते, प्रभू म्हणाला की तो सैतानाचा हात आहे, आणि म्हणाला, “त्याचा निषेध कर.”

209 आणि मी म्हणालो, “मृत्यू, तू त्याला पकडू शकत नाहीस. त्याला परत आण, त्याला सोडून दे.” तेथे, त्याने त्याच्या पायावर उडी मारली, तसेच, त्याच्या शरीरात एकही मोडलेले हाड नव्हते. हा परमेश्वराचा शब्द आहे. मी परमेश्वराचा शब्द वापरू शकत नाही जोपर्यंत परमेश्वराचा शब्द माझ्याकडे येत नाही.

210 परंतु पवित्र शास्त्रात, परमेश्वराच्या शब्दाने मला या आजारी लोकांसाठी प्रार्थना करण्याची सेवकाई दिली आहे; त्यांच्यासाठी प्रार्थना करण्याची सेवकाई तुला देतो. आता, “विश्वासाची प्रार्थना आजाऱ्यास वाचविल.” तुम्ही आपली मस्तके झुकवा, आपण प्रार्थना करू या; आपण त्यांतून जाताना, आपण तो काय म्हणतो ते पाहू या.

211 आपण ख्रिस्ती आहात का, आपण आहात? येशू तुम्हाला बरे करील असा तुमचा संपूर्ण मनापासून विश्वास आहे का? पोटाचा थोडा त्रास आहे; बहीण, बरीच वर्षे यामुळे यातना सहन करत आहेत. जर तुमचा विश्वास असेल तर, आता तुम्ही बरे व्हाल.

212 आता, प्रभु देवा, या तरुण स्त्रीला तू मदत केली नाहीस तर तिला मरावे लागेल. मी तिच्याकडे पाहत असतानाच, आता मी तिच्यासाठी प्रार्थना करीत आहे, मला असे कोणतेही कारण दिसत नाही की तिने मरावे.

आणि मी माझ्या आत्म्यात असे अनुभवत आहे की, प्रभु, ही तुझी परवानगी दिलेली इच्छा आहे, आता, मी त्याचा निषेध करतो: सैताना, तिला सोड!

येशू ख्रिस्ताच्या नावात, ती बरी होवो, या मंडळीकडे येवो, आणि देवाच्या गौरवाची साक्ष देवो. आमेन.

213 बाई, ते इतके सोपे आहे, तुम्ही बरे व्हाल. बंधू यावर तुमचा विश्वास आहे का?

[भाऊ ब्रॅन्हम मायक्रोफोनपासून दूर होतात—सम्पा.] आपण बरे व्हाल असा आपला विश्वास आहे काय?

आता जा, आपण जे खात होता ते खाण्यास सुरूवात करा...तेव्हा, आपण बरे व्हाल.

आता, आपण जगाला एक तडाखा द्यावा आणि दुर्बल करावे ही अपेक्षा आहे; त्याने आपल्याला एक तडाखा दिला, आणि आपल्याला दुर्बल केले आहे. आता, स्वर्गाचा देव पापाचे मोचण देण्यासाठी त्याचा तडाखा जगापासून घेतो, त्याच नावाने, आपल्याला पापांचे मोचण देवू शकतो, तुमच्यापासून तो तडाखा काढून घेऊ शकतो, आणि आपल्याला बरे करू शकतो.

विश्वास ठेवा की तो त्या हृदयाचे ठोके चांगले करू शकतो? आपण तसे करा, आपण बरे व्हाल...?...

214 प्रभु येशू, या गरीब बाईने आपले उर्वरित आयुष्य या खुर्चीवर घालवले पाहिजे आणि मग, ती घेतली गेली पाहिजे. परंतु आम्ही मागत आहोत की सैतानाची ही शक्ती तिच्यापासून निघून जावो. ती नेहमीप्रमाणे जगो आणि चालू लागो आणि जशी ती होती तशी सामान्य राहू दे. आम्ही येशूच्या नावाने मागतो. आमेन.

215 तुझा विश्वास आहे? हे पूर्ण झालेले काम आहे, ते झालेले आहे. काय मामला आहे? कोणत्याही भीतीशिवाय, नाही...नव्हता...? एकदा आपला कर्करोग बरा झाला होता...?...मुक्त हो, येशूला सर्व काही दे.

216 प्रभु येशू, मी या बाईवर माझे हात ठेवतो आणि तिच्या आजाराला धमकावतो. मला माहित आहे की ती ख्रिस्ती असून, आत्म्याने जन्मलेली आहे. येशू ख्रिस्ताच्या अद्भुत नावाने मी ते तिच्यापासून काढून टाकतो. आमेन.

217 प्रभु देव, तिच्या अनमोल भावाकरिता, मी येशूच्या नावात त्याच्या तारणासाठी प्रार्थना करतो. त्यावर उभे रहा. आमेन. केले जाईल.

218 मुला, तू तुझे आरोग्य स्वीकारायला तयार आहेस? ठीक आहे, ते त्याच्या हातात गेले आहे.

219 प्रभु येशू, या तरूणावर, ज्याने म्हटले आहे की, तूझ्या कडून, तो त्याचे आरोग्य प्राप्त करण्यासाठी प्रार्थना करतो. तुझा सेवक म्हणून, मी येशू ख्रिस्ताच्या नावाने त्याच्यावर माझे हात ठेवतो...?...आमेन.

आता, फक्त कोणत्याही...?...आता, आपण फक्त त्याच्या नावाचा धावा करा. आता, नाही—मला नाही...?...

220 देव पित्या, एकुलता एक मूला प्रमाणे जो एकदा आईच्या छातीवर टेकला, तिने त्याला थोपटले आणि—आणि त्याच्याबरोबर प्रार्थना केली आणि जेव्हा तो लहान बालक होता तेव्हा त्याचा छोटासा हात धरला. आता, सैतानाने तिला वेड्यांच्या संस्थेत ठेवले आहे. देवा, तो जिवंत देवाच्या पवित्र मंडळीमध्ये आला आहे, एक मंडळी जी देवाच्या आत्म्याने जन्म पावलेली आहे, एक मंडळी ज्यामध्ये देवाचा आत्मा राहतो, आणि तो स्वत:ची ओळख देतो. आणि आज, प्रार्थनेद्वारे, आम्ही त्या संस्थेपासून त्या बाईची सुटका करतो. येशू ख्रिस्ताच्या नावात, आम्ही प्रार्थना करतो. आमेन.

घरी जा, तू बरी झाली आहे.

आल्याबद्दल धन्यवाद, आपल्या आईसाठी मागितल्याबद्दल; तो खरा मुलगा आहे.

221 हा तुझ्या सुटकेचा दिवस आहे. प्रभु येशू, या तरूणीसाठी, तिच्या पतीच्या तारणासाठी आणि तिच्या घराला मुक्त करण्यासाठी, तिला ते येशू ख्रिस्ताच्या नावात

प्राप्त होवो, जो म्हणतो की "या, आता यावर विश्वास ठेवा." आणि ते एक पूर्ण झालेले काम आहे.

222 प्रभू, डॉक्टरांनी म्हटले आहे की, प्रभु, ते तिच्या शरीरात आहे, तिच्या डोळ्यांत येत आहे. ती मुक्त होण्यासाठी, ह्या वेदीजवळ आली आहे, जेव्हा ही पवित्र मंडळी प्रार्थना करीत आहे, मी तिची सुटका येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये मागतो, ही पीडा तिचे शरीर सोडून जाईल. हे पूर्ण झालेले काम आहे.

तिच्या मुलासाठी, मी हा रुमाल आशीर्वादित करतो. त्याची श्रवणशक्ती आणि योग्य स्थिती त्याच्या कानात परत येवो...?...

223 आता मंडळी बोलते; आता मंडळी ख्रिस्ताचे गूढ शरीर आहे. आम्ही सर्व तुमच्यासाठी प्रार्थना करीत आहोत. पहा? आम्ही नाही—आम्ही नाही यापुढे जगात असल्याचा दावा करत नाही. आम्ही कुठे जात आहोत याबद्दल आश्चर्य व्यक्त करण्याबद्दल बोलत नाही. आम्हाला मार्ग सापडला आहे. आमचा जन्म त्या मार्गाने झाला होता. आम्ही जिवंत देवाची मंडळी (त्याचा एक भाग) आहोत; अर्थात, ती सर्व जगभर पसरलेली आहे. पण हा त्यांचा समूह आहे. आज, आपण एकत्र त्याच्या नावामध्ये आलो आहोत. आम्ही जे त्याने सांगितले आहे, ते करायला आलो आहोत. जेव्हा आपण एकत्र येतो तेव्हा तो काय प्रकट करू शकत नाही. आजारी लोकांसाठी प्रार्थना करा, त्यांच्यावर हात ठेवा, "विश्वासाने केलेली प्रार्थना आजाऱ्यांस वाचवील."

224 आपला हृदय रोग आपल्याला सोडून जावो. येशू ख्रिस्ताच्या नावाने, मी मला देवाने दिलेल्या सेवकाईचे पालन करतो...?...

***त्या दिवशी कलवरीवर*** MAR60-0925

(That Day On Calvary)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, रविवार सकाळी, 25 सप्टेंबर, 1960 रोजी, ब्रॅन्हम टॅबरन्याकल, जेफर्सनव्हीले, इंडियाना, यू.एस.ए., येथे प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेरेकॉर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हा मराठी अनुवाद व्हॉईस ऑफ गॉड रेकॉर्डिंगद्वारे छापला आणि वितरित करण्यात आला.

MARATHI

©2021 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

## छपाईच्या हक्काची सूचना

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice Of God Recordings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org